विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०२**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक ३ / फेब्रुवारी २००६

## संपादकीय

## नवे ते हवे विरुद्ध जुने ते सोने

माणसाच्या मनावर किती, कोणते तणाव आणि किती प्रमाणात कार्यरत असतात याची गणिते अतिशय अवघड आहेत. कोणाला कोणत्या गोष्टींचा ताण अणि का येतो हे व्यक्तिसापेक्ष आहे. कोणाला बाजारात गेल्यानंतर मटणाच्या दुकानात चालणारी कापाकापी लांबून पाहूनही त्रास होतो. तर कोणाला हे दृश्य अजिबात त्रासदायक वाटत नाही. ताणतणावांचे प्रमाण, त्यामागील कारणे यामध्ये सातत्याने होणारी वाढ लक्षात घेणे, या ताणतणावांचे व्यवस्थापन करणे याची स्वतंत्र शास्त्रे विकसित होत आहेत व या विषयांवर अनेक अभ्यासपूर्ण ग्रंथही येत आहेत. मनावर ताण येण्यास लागणारी अशी कारणे असंख्य असली तरी मध्यमवर्गीय माणसाच्या मनावर येणाऱ्या अशा कारणांचा वेध विचार प्रवृत्त करणारी ठरावी. मध्यमवर्गीय माणसाचे एका शब्दात वर्णन करावयते झाल्यास 'भिडस्त' किंवा 'पापभीरु' असे करता येईल. त्यामुळे इतर वर्गापेक्षा 'लोकांचा विचार' या मध्यम वर्गात प्रामुख्याने केला जातो. त्यातून रॅट रेस, दुसऱ्यांशी तुलना वा बरोबरी करणे ही वा तत्सम वैशिष्ट्ये प्रामुख्याने आढळतात. Tim Hindle यांच्या 'Reducing Stress' या पुस्तकात मध्ये ताणतणावांची व्याख्या 'मानसिक व शारिरिक स्वास्थ्यात बाधा निर्माण करणारी अवस्था' अशी दिली आहे.

जीवनातील सर्व क्षेत्रे, घरगुती जीवनपध्दतीत आज तंत्रज्ञानाचा अतिरेकी सोस असलेला दिसतो व तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विकसित झालेली हजारो उपकरणे वापरणे हे सोशल स्टेटस् चे मोजमाप होऊ पहात आहे. किंबहुना वीजेचा वा इलेक्ट्रॉनिक्सचा वापर म्हणजेच प्रगती असा प्रगतीचा चुकीचा अर्थ रुढ होऊ पहात आहे. पाश्चात्य जगातील 'वापरा आणि फेका' ही जीवन पध्दती आपल्यास अनेकानेक कारणांनी परवडणारी नसली तरी 'लोक काय म्हणतील' याचा ताण घेऊन आपण नवनव्या वस्तू वेगाने घेत रहातो व तितक्याच वेगाने त्या कालबाह्य ठरवून फेकूनही देत रहातो. नवीन वस्तू खरेदी करताना त्या नव्या वस्तूंशी मिळते जुळते (ॲक्वेण्ट) होण्याचा ताण असतो, मॅन्युअल वाचा, ते समजून घ्या शिवाय त्यासाठी लोन मॅनेज करा .. अनेकानेक ताण मनावर कार्यरत होत असतात. 'नवे ते हवे' हा सोस कुठपर्यंत तर मरेपर्यंत. रोज आपलं नवीन तंत्रज्ञान बाजारात येतच आहे.

'जगी सर्व सुखी' असा कोणी नसला, तरी जुनी गोष्ट फेकून देताना सुखाचा जीव दुःखात पडण्याचीच शक्यता अधिक.



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक ३ / फेब्रुवारी २००६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री राघवेन्द्र स्वामी महाराज - जीवन व कार्य प्रकरण तिसरे | शं. बा. मठ | ३ |
| २) | 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने | यशवंत साने | ७ |
| ३) | ब्रम्हा | अक्षय कुलकर्णी | १३ |
| ४) | अंधश्रद्धेचा विळखा | गीतेश ग. शिंदे | १७ |
| ४) | यश कसे मिळवाल | प्रसन्न गो. कुलकर्णी | २० |
| ५) | ॥ इथे मऱ्हाठीचिये नगरी ॥ | श्री. अमेय रानडे | २१ |
| ६) | शिक्षण आणि कला | सौ. मंजिरी दांडेकर | २४ |
| ७) | ॲडव्हान्सड् केमिस्ट्री- पुस्तक परिचय-१ | सौ. भारती अ. जोशी | २६ |
| ८) | वृत्तपत्रातील वाचकांची पत्रे - सर्वेक्षण | माजी विद्यार्थी | २७ |
| ९) | जग बदलू पहाणारांचे जग- पुस्तक परिचय-२ | प्रा. मोहन पाठक | २९ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक ८वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

# श्री राघवेन्द्र स्वामी महाराज - जीवन व कार्य
## प्रकरण तिसरे

*वेद व भारतीय संस्कृतीचा गाढा अभ्यास असणारे श्री. शंकर मठ यांच्या राघवेंद्र स्वामींवरील लेखमालेतील हा पुढील लेख - संपादक*

### तंजावरला प्रयाण

ही मंडळी तंजावरला गेली. तंजावर एक मोठे शैक्षणिक केन्द्र होते. तिथे खूप अद्वैती मंडळी होती. त्या पैकी एक जण चर्चेसाठी आला. 'तत्वमसि' यावर चर्चा ठरली हे अद्वैत संबंधी एक महावाक्य आहे असा उहापोह त्यांनी केला. सुधीन्द्राने वेंकण्णाला बोलावयास सांगितले. त्यानी या वाक्याने द्वैतमत कसे प्रस्थापित होते हे सोदाहरण स्पष्ट केले. सुधीन्द्रातला फार बरे वाटले. आपल्या शिष्याचा पुढील काळ भव्य आहे. असा आर्शीवाद दिला.

### स्वतंत्र बिन्हाड

वेंकण्णा आता सर्वांचे लक्ष बनले. तरुण तत्वज्ञान्याकडे बरेच लोक आकर्षित झाले. त्यांना मठात रहाणे शक्य नव्हते. त्यांनी वेगळे बिन्हाड थाटले. त्यांना आता दारिद्र्याची खरी झळ लागली. हा दैव दुर्विलास आहे. वेंकण्णा सारख्या विद्वान माणसाला, वीणा वादकाला अन्नासाठी भटकावे लागले व याचना करावी लागली. तिथे काही काळ कुटुंबासह राहिले. त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव लक्ष्मी नरसिंह ठेविले. हे नाव त्यांच्या मेहुण्याचे होते. ज्यानी वेंकण्णाला शिक्षणाचा पाठ दिला व भविष्याचा मार्ग आखून दिला. वेंकण्णा पित्याचे कर्तव्य पार पाडीत असतानाच समाधी सुखही अनुभवीत. एकदा एका धनिकाने ब्राह्मण भोजन घालण्याचे सत्र सुरु केले. व सर्वांना पाचारण केले. वेंकण्णा कुटुंबासह तेथे गेले. तेथील प्रमुखांनी वेंकण्णाला चंदन घासावयास सांगितले, म्हणजे तुला भोजन मिळेल. हा अपमान त्यांना गिळावा लागला. कारण दारिद्र्य. चंदन घासताना वेंकण्णा अग्नि सूक्त म्हणू लागले. गंध उगाळून तयार झाला. अन्न मिळाले. सर्वांगी अंगाला हे चंदन लावले. लोक ओरडू लागले कारण त्यात दाहकता होती. वेंकण्णाला बोलावण्यात आले. त्या धनिकाला ही गोष्ट कळली. तो वेंकण्णाच्या पाया पडला. वेंकण्णानी वरुणाची प्रार्थना केली.. सर्वांना गारवा जाणवू लागला. वेंकण्णांचा सत्कार करण्यात आला. व सन्मानाने त्यांनी द्रव्य कपडा देऊन उत्सवानंतर पाठवणी केली. पण दुर्दैव असे की त्याच रात्री घरी या सर्वांची चोरी झाली. देव आपली सत्वपरीक्षा घेतो असे वेंकण्णाना वाटले. पुनःमठाचा आश्रय घेण्याचे ठरविले.

### कुंभकोणम् मठ

मठात मठाधीशांना मदत करणारी पुष्कळ मंडळी झाली. वेंकण्णा व त्यांचे कुटुंब अध्यात्मिक व भौतिक गोष्टींच्या परिपूर्तीसाठी तेथे गेले. यांना अन्न वस्त्र निवारा तेथे प्राप्त झाला. ही उभयता मठातील उपयुक्त धार्मिक कृत्य करुन सर्वतोपरी मदत करीत. लक्ष्मी नरसिंह या बालकाचे उपनयन झाले. सुधींद्र स्वामींच्या देखरेखीखाली हा संस्कार झाला. वेंकण्णाना थोडा वेळ का होईना स्वर्ग सुखाचा आनंद झाला.

### गुरुजींनी इच्छा प्रकट केली

हे कौटुंबिक जीवन अनंत काळपर्यंत चालणारे नव्हते. एके दिवशी सुधीन्द्र स्वामींनी वेंकण्णाना बोलावले. या पुढे मठ पूर्णपणे सांभाळावे असे सांगितले. मी आता शरीराने थकलो आहे. व कोव्हाही हा लोक सोडून जाईन. मूळ

रामाचे पूजन एक दिवसही खंडित पडू नये अशी माझी इच्छा आहे. एखादा तरुणच या पुढे हा मठ सांभळील. मी वयस्क झाल्याने माझ्याकडून योग्य काम होईनासे झाले आहे. त्यांचे ते भाषण ऐकून वेंकण्णाना एक प्रकारची असुरक्षितता वाटली. स्वामी पुढे म्हणाले - या क्षणी मी तुझ्यावर अवलंबून आहे. तुझा शास्त्रात अभ्यास पूर्ण झाला आहे. न्याय सुधा नांवाचे उत्कृष्ट भाष्य तू लिहिले आहेत. द्वैतमताचा कण अन् कण तुला माहीत आहे. तुझ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. आपल्याबद्दल स्वामींनी असे बोलावे याचा वेंकण्णाना आनंद झाला. पुढील कार्याला उत्तेजना मिळू शकेल म्हणून ही जबाबदारी देखील घेण्यास तो तयार होता. स्वामी आणखी म्हणाले - माझ्याकडे आता दुसरा माणूस नाही. तुझ्या स्वाधीन मठाची जबाबदारी सोपवण्याखेरीज दुसरा मार्ग नाही. तर तू संन्यास घेण्यासाठी सिध्द व्हावे. धार्मिक विधि पार पाडण्यास तयार हो. हे ऐकून वेंकण्णाना धक्काच बसला. त्यांच्या समोर तरुण पत्नी व लहानग्या मुलाचे संगोपन आणि स्वामींनी व्यक्त केलेली इच्छा यात त्यांचे मन हेलकावे खाऊ लागले. संन्यास घेण्यास सिध्द व्हावे तर पत्नी व मुलाची जबाबदारी टाळण्यासारखे होईल, नाही म्हणावे तर गुरुजींचा रोष ओढवून घेतल्या सारखे होईल. प्रश्न चुटकी सरशी सुटण्यासारखा नव्हता.

**वेंकण्णा धर्मसंकटात सांपडले.**

थोडेसे उसने बळ आणून स्वामींना ते म्हणाले- मी तरुण आहे. व कुटुंबवत्सल आहे. संन्यास घेण्यास योग्यतेचा नाही. महाराज कृपाकरुन मला क्षमा करा. मला आपली आज्ञा स्वीकारता येत नाही. इतके बोलून शरमिंदा होऊन एका कोपऱ्यात उभे राहिले. क्षणभर तिथे स्तब्धता पसरली.

**धर्मसंकटातून सुटाका**

त्यावेळी तेथे सुधींद्र स्वामींच्या पूर्वाश्रमीचे एक मित्र होते. त्यांनी वेंकण्णांचे म्हणणे बरोबर असल्याचे सांगून पुढे म्हणाले- मी शास्त्र पठण केले आहे. मला भौतिक जगाचा वीट आला आहे. मी वृध्दपण आहे. स्वामींनी मला ही जागा द्यावी आणि संन्यास दीक्षा द्यावी.

सुधीन्द्र स्वामींनी यावर विचार केला. काही दिवसांनी स्वामींची तब्येत खालावली. त्यांनी त्या वृध्द गृहस्थांना मठाधीश म्हणून नेमावयाचे ठरविले. संन्यास दीक्षेनंतर त्यांचे नांव यादवेन्द्रतीर्थ असे ठेवण्यात आले व त्यांच्यावर मठाची जबाबदारी टाकली. यादवेन्द्र मठाचा कारभार पाहू लागले. आणि सुधीन्द्र स्वामींची सुश्रुषा पण करु लागले. परमेश्वरकृपेने सुधीन्द्रांची तब्येत सुधारू लागली व काही आठवड्यात ते नित्य कर्म व पूजापाठ करु लागले. एकाच मठात दोन कारभारी राहू नयेत म्हणून यादवेन्द्राना फिरतीवर पाठविले.

सुधीन्द्र मठाचे काम पाहू लागले. वेंकण्णा व कुटुंबीय आनंदात राहिली. नजिकच्या काळात तरी संकट नव्हते. द्वैत सिध्दांत पाठ व तत्त्वज्ञानाचे पाठ पूर्वीप्रमाणे सुरु झाले. लक्ष्मी नरसिंह महा वर्षाचा झाला. तो वडिलांसारखाच तरतरीत होता. तो भाषा व्याकरण आणि प्राथमिक स्वरुपाचे तात्विक ज्ञान द्वैत तत्त्वज्ञान शिकू लागला. सरस्वती त्या मठात सर्वांशी गोड वागून व सर्वांची सेवा करत आवडती झाली. ती आपल्या नवऱ्याला त्याच्या कार्यात मदत करीत असे.

**पुन:संकट उभे राहिले.**

असा काळ सुरळित चालला होता. थोड्याच दिवसात सुधीन्द्र अचानक आजारी पडले. ते अशक्त झाले. मूळरामाची पूजा त्यांच्या हातून घडणार नाही असे त्यांना वाटले. यादवेन्द्रांना त्यानी पाचारण केले. मात्र ते नेमके कोठे आहेत याचा पत्ता लागेना. त्यांच्याशी संपर्क साधू शकले नाहीत. पूजा व मठाचा कारभार नित्य चालला पाहिजे. कुणीतरी हे काम पत्करले पाहिजे. आपल्या आवडत्या शिष्यालाच पुनः गळ घालण्यात आली.

वेंकण्णाला स्वामींनी बोलावले. ते लटपटत सुधीन्द्र स्वामींकडे आले. तेथे भयाण शांतता होती. कोणीही बोलेना. अत्यंत क्षीण आवाजात सुधीन्द्र वेंकण्णाला म्हणाले - मला बोलवणे भाग पडल्यामुळे मी तुला इथे बोलविले आहे. कोणत्याही औषधाने मी बरा होणार नाही. माझी अवस्था पहा. ईश्वरीइच्छा अशी आहे की मी हा लोक सोडून जावे. मूळरामाची पूजा थांबवता येणार नाही. तुंगभद्रा काठी हंपीला वृंदावनात कायमची विश्रांतीघ्यावी असे वाटते. तुला आता माझा कारभार हाती घेणे भाग आहे. माधवाचार्यांनी सुरु केलेले व्यापक कार्य या पुढे तू केले पाहिजेस. यादवेन्द्र हे उपलब्ध नाहीत. मी शरपंजरावर पहुडलो आहे. तुला माझा उत्तराधिकारी म्हणून नेमले.

हे सारे ऐकून वेंकण्णाच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. त्याचे लटपटणे वाढले. ते खाली कोसळणार या बेतात होते. स्वीमींनी सांगितलेली जबाबदारी त्यांच्या कानात घुमू लागली, तसेच कौटुंबिक जबाबादारीचा आक्रोश ऐकू येऊ लागला. कुटुंबाची कोण काळजी घेईल ? ती भुवनगिरीला राहील काय? या विचाराने ते मूक झाले. स्वामींनी त्यांना निर्णय विचारला. काय अडचण आहे. काय तुला भेडसावते ? तुझ्यावर कुंटुबाची जबाबदारी असल्याचे मला कळते. परंतु माधावाचार्यांची इच्छा जी आहे त्याचा विचार कर. तू येथील देवतांची पूजा करावी अशी त्यांची इच्छा आहे. तू अध्यात्मिकतेचा मेरुमणी बनावा असे त्यांना वाटते. वेद, उपनिषदावर भाष्य लिहिण्याचे विसरलास काय ? आम जनतेचे कल्याण करणे हे विसरलास काय ? तू म्हणशील की तू तरुण आहेस. तुझी बायको तरुण आहे. मध्वाचार्यांनी संन्यास घेतला तेव्हा ते काय वयाचे होते ? जय तीर्थ हे दरिद्री नव्हते. ते आपल्या वडिलांचे एकमेव पुत्र होते. तसेच तरुण असून सुखात होते. परंतु त्यानी संन्यास घेतला. व परमसुखाचा लाभ प्राप्त केला. त्यांनी नाही का कर्तव्य श्रेष्ठ मानले ? भौतिकतेत रममाण होण्यापेक्षा संन्यस्त जीवनात जास्त सुख आहे. संन्यास घेणे म्हणजे फार मोठा त्याग समजतोस काय ? मोठ्या कारणासाठी प्रत्येकालाच छोट्या गोष्टींचा त्याग करावाच लागतो. माझी जबाबदारी तू स्वीकारावीस अशी तुला आज्ञा आहे. स्वामींना पुढे बोलवेना अपरिहार्य गोष्ट वेंकण्णानी स्वीकारायचे ठरविले. त्यांनी व्यक्तिगत सुखाचा त्याग केला. त्यानेच लोक कल्याण साधता येते व उत्तम गोष्टींचे जतन करता येते. प्रभूची प्रेम भाषा, न्याय व सौंदर्य यांचे वितरण करता येते.

त्या विमनस्क स्थितीत साक्षात् भगवती सरस्वती हिने त्यांच्या डोक्यावर हात ठेवला, म्हणाली- भौतिक संपदा ही अशाश्वत आहे. जेव्हा आत्यांतिक कल्याण साधावयाचे असते तेव्हा संन्यस्त वृत्तीच योग्य असा वेंकण्णाना उपदेश करुन स्वामींचे म्हणणे स्वीकारावयास लावले.

## कुटुंबाची आवराआवर

वेंकण्णांनी संन्यास स्वीकारण्याचे ठरविले. बायकोची व मुलाची सोय लावण्याच्या मागे ते लागले. आपल्या वडीलभावाकडे भुवनगिरिला बायकोला पाठविण्याचे ठरविले. ती अत्यंत नाईलाजाने भुवनगिरिला गेली. सुधीन्द्र पुनःबरे होतील व वेंकण्णावरील संकट टळेल असे तिला वाटले अथवा यादवेन्द्र स्वामी अकस्मात येतील अशा भावनेने तिने भुवनगिरीची वाट धरली.

## वेंकण्णा संन्यासी झाले.

देवाच्या मनात असते तेच घडते, सुधीन्द्रांनी संन्यास दीक्षा देण्याचा दिवस ठरविला. वेंकण्णाना तयार राहावयास सांगितले. धार्मिक कृत्यात संन्याशाला सर्वच गोष्टींचा त्याग करावा लागतो. मुंडण करणे, जानवे तोडून टाकणे, सर्व गृहस्थाश्रमातील कर्तव्याना तिलांजली देणे त्यासाठी विराज होम करणे. या साऱ्या गोष्टी करण्यासाठी वेंकण्णा सिध्द झाले. संन्याशाला देवा खेरीज दुसरा आप्त माणूस

नाही. संन्यास घेण्यापूर्वी स्वतःचे श्राध्द करावे लागते. दिवस ठरविण्यात आला. तंजावरचे अधिप या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले. त्यांनी संन्याशाचा सत्कार केला. तंजावरच्या ठिकाणी मोठ्या थाटात हा समारंभ पार पडला. तो दिवस, फाल्गुन द्वितीया, रुधिरोग्दारी संवत्सर शके १५४३ ख्रिस्ताब्द १६२१ होता.

वेंकण्णाना जुन्या स्वामींजवळ बसविले, अभिषेकानंतर त्या स्वामींनी वेंकण्णाचे राघवेन्द्रतीर्थ असे नाव ठेवले. राघवेन्द्रतीर्थ संन्याशी वेषात अत्यंत विलोभनीय दिसू लागले. नवीन युगाचा प्रारंभ झाला. सुधीन्द्र स्वामींनी नवीन संन्याशाचे कौतुक केले आणि सर्वांना वंदन करून स्वामींनी देह ठेविला. नव वृंदावनातील संन्यासी समूहात विलीन झाले.

सरस्वीतला ही बातमी कळली. आता आपला नवरा संन्याशी झाला हे पाहून तिने विहिरीत उडी टाकून प्राणार्पण केले. यादवेन्द्र फार दिवसांनी परतले. राघवेन्द्रांनी त्यांचे यथोचित स्वागत केले. दोन स्वामी एका ठिकाणी राहणे योग्य नाही हे जाणून यादवेन्द्र पुनः फिरतीवर गेले. काही वर्षांनी मुद्रमले इथे त्यानी देह ठेवला. तेथे त्यांचे वृंदावन अद्याप आहे.

राघवेन्द्रांनी ईश्वराची प्रार्थना केली. आत्मार्पणाबद्दल सरस्वतीचा दोष नाहीसा करावयास सांगितले राघवेन्द्र स्वामींनी मठाची फार मोठी जबाबदारी स्वीकारली व ती अत्यंत कुशलतेने पार पाडली

(क्रमशः)

- शं.बा. मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

•••

## माहिती करून घ्या !

ठाणा कॉलेज, बेडेकर कॉलेज असा उल्लेख करणारांसाठी -

महाविद्यालय परिसरात विद्या प्रसारक मंडळ या मातृसंस्थेच्या पुढील संस्था आहेत. त्यांची पूर्ण नावे मुद्दाम देत आहे. केवळ ''ठाणा कॉलेज'' म्हणण्यापेक्षा महाविद्यालयाचे नेमके नाव व मराठीत उच्चारले तर ....

१) बांदोडकर कॉलेज- बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
२) जोशी कॉलेज - केशव गणेश जोशी कला महाविद्यालय
३) बेडेकर कॉलेज - नारायण गोविंद बेडेकर वाणिज्य महाविद्यालय
४) लॉ कॉलेज - ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय
५) व्हीपीएम् पॉलिटेक्निक - विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

महाविद्यालय परिसराला 'ज्ञानद्वीप' हे नाव आहे. परिसराभोवती उद्यान आहे. हे उद्यान अजून विकसित होत आहे. या उद्यानाला 'ज्ञानमार्ग' हे नाव आहे. या उद्यानात छोटे कार्यक्रम (२५-३० जणांचे) सहज होऊ शकतात. कवी संमेलन, साहित्यिक चर्चा, कथाकथन इ. कार्यक्रमांना सोयीच्या ठराव्यात अशा काही जागा मुद्दाम बनविल्या आहेत.

ज्यांना यात रस आहे त्यांनी आमच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

- संपादक

# भारतीय संस्कृति - बीज - मॉडेल - साधने

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा आठवा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

## शिक्षण संकल्पना

आपण 'शिक्षण' ह्या संकल्पनेचा विचार करत आहोत. अनेक दृष्टिकोनातून हा विचार करता येईल. पण, आपण एका विशिष्ट संस्कृतीत म्हणजे भारतीय वैदिक संस्कृतीत त्याचा विचार करत आहोत. काय याचा अर्थ ?

कुठल्याही मानवाचे अस्तित्व म्हणजे त्या राष्ट्राच्या 'भूभागावर' 'पर्यावरणात' फुललेले 'सांस्कृतिक अस्तित्त्व', हे त्या समाजाच्या पिढ्यानपिढ्या, शतकानुशतके चालत आलेल्या जीवन वैशिष्ट्याच्या संदर्भात बघावे लागेल. ह्या जीवनाचा हेतू, उद्दिष्ट व ज्ञानहेतू ह्या एखाद्या विशिष्ट दिशेचा निर्देश करत असेल - तर तो हेतू, ध्येय व उद्देश कोणता व तो कसा सातत्याने जोपासला जातो हे त्या संस्कृतीच्या युगानुयुगे चालणाऱ्या जीवनप्रवाहात, विचारात, आचरणात शोधावा लागेल.

## वैदिक सनातन संस्कृति

अश्या तऱ्हेच्या अभ्यासाला म्हणूया 'भारतीय-हिंदू-सनातन धर्म-वैदिक संस्कृति-' इतके भक्कम, ठाशीव, जाज्वल्य, जिवंत दुसरे उदाहरण - ह्या पृथ्वीवर सापडणे कठीण आहे. नव्हे, सत्याच्या निकषावर हेच एक एकमेव उदाहरण समोर येते.

## संस्कृतिचे बीज

पण, ह्या उदाहरणात एक अडचण अशी आहे कीं ही जीवनपद्धती भौतिक दृष्टीने जिवंत स्वरुपात निर्भेळ स्वरुपांत आज भारतात पहावयाला मिळणार नाही. म्हणजे हे स्वरुप, 'दर्शनी' स्वरुपांत, इंग्रजाळलेले व पाश्चात्य भौतिकवादी, Positivist, Secular, भोगवादी भेसळ धर्मपद्धती व जीवन व्यवहार ह्यात प्रभावित झालेले दिसेल. पण, जास्त तीक्ष्णपणे, खोलवर प्रत्येक भारतीय जीवाचा शोध घेतला तर त्यांत युगानुयुगे चालणाऱ्या 'बीजाची' सृजनात्मक Creatively evolutionary क्षमता असलेली वैदिक ज्ञान व उत्क्रांतीची सूत्रे सापडतील.

आपण त्या बीजाचा शोध घेणार आहेत. ह्या बीजाची अभिव्यक्ती, अविष्कार व संस्कृति ही कोठल्या 'शिक्षण' व्यवहारात ह्या 'पुण्यभूमीवर' चालू आहे. - व्यक्त किंवा अव्यक्त स्वरुपात आणि गुह्य, अनिर्वचनीय, आगम, 'स्पिरीच्यूअल' पद्धतीने जिवंत आहे हे पहाणार आहोत. ह्या 'पुण्यभूमीवर' जे अनेक परकीय आक्रमक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक हल्ले झाले त्यालाही तोंड देऊन हा आश्चर्यकारक वैश्विक वैदिक सांस्कृतिक प्रवाह - आकाशगंगेसारखा - कसा अव्याहत चालू आहे हे पहाणार आहोत.

पण, हे सूत्र एखाद्या ऋषीला दिसणे जरी शक्य असले तरी ह्या पृथ्वीवर १०० वर्षांची आयुमर्यादा घेऊन जन्मणाऱ्या जीवाला हे सत्य दर्शन सहज साध्य नाही. त्याला जे दर्शन दिसेल त्या दर्शनाच्या विचारबैठका काहीश: क्षीण, तात्कालिक पाश्चात्य संस्कृतीवर आधारलेला दिसतील त्याचा परामर्ष, प्रथम घ्यावा लागेल व ते स्वाभाविकच आहे.

## पाश्चात्य शिक्षण पद्धती


दिशाच्या मागील दोन अंकात या बाजूने आपला विचार मांडला. त्यामुळे पुन्हा त्याच प्रवाहात फार न अडकता आपण पाश्चात्य ज्ञानसाधनेचे शिक्षण कोणत्या गुंतवळ्यात फिरते आहे व त्या तुलनेने भारतीय वैदिक ज्ञानपद्धतीत कोणती स्पष्ट दिशा, भूमिका व ध्येये आहेत याचा विचार करु या.

प्रथमच हे विशद करावयाला हवे कीं 'भौतिक जीवनाला दैनंदिन आधाराला व सर्वसाधारण प्राणीतत्त्व जीवनाला ज्या तऱ्हेच्या सामाजिक शैक्षणिक, तंत्रज्ञान यांचा व्यावहारिक आधार लागतो. त्याचाच केवळ आपण 'शिक्षण ' ह्या सांस्कृतिकतेच्या 'दिव्य संकल्पनेत' सध्या विचार मांडत नाही आहोत. कारण, 'स्मृती संहिता ह्या जश्या वैदिक पद्धतीत 'तात्कालिक स्वरुपाच्या' मार्गदर्शक असतात - जवळजवळ तसाच मार्गक्रम ह्या 'तात्कालिक शिक्षण पद्धतीत'. असतो. त्याचा आधार ज्या भौतिक उपयुक्ततावादी संकल्पनेत केला जात आहे, त्या गोष्टींचा विचार आपण आतां करणार आहोत. सध्याच्या आवश्यक ज्ञानात इन्कम टॅक्स, रेल्वेचे व विमानाचे टाईमटेबल हा तात्कालिक विषय महत्त्वाचा मानला पण, त्याला चिरकालीन ज्ञान किंवा माहिती ही पातळी नाही, हे उघड आहे.

## दूषित वैचारिक बैठक

त्या व्यावहारिक इंद्रियगम्य भौतिकवादी, विचारपद्धती कुठल्या भोवऱ्यात गटांगळ्या खात आहे ? ह्या वैचारिक चर्चेची सुरवात जॉन व्हीलर ह्यांच्या भाष्याने करु या. वैज्ञानिकांना कोणता प्रश्न पडला आहे ?

''Observer and Participant'' ''Nothing is more important about the quantum principle than this, that it destroys the concept of the world as '<u>Sitting out there</u>' with the observer



चित्र नं. - १ Observer or participant

safely from it by a 20 centimeter slab of plate glass. Even to observe so miniscale an object as an Electron, he must install his chosen measuring equipment. It is up to him to decide, whether he shall measure <u>position or momentum.</u> To install the equipment to measure the one prevents and excludes his installing the equipment to measure the other.

Moreover, the measurement changes the state of the electron. The universe will never afterwards be the same. To describe what has happened, one had to cross out the old word 'observer' and put in its place the new word 'participator'. In some strange sense the universe is a participatory universe.

- John A. Wheeler
The physicist's conception of Nature.

जॉन व्हीलर ह्यांच्या ह्या इंग्रजी भाष्याचा मथितार्थ हा आहे कीं आपण कोण आहोत ? ह्या अफाट आणि गूढ विश्वाचे - त्या विश्वाच्या बाहेरुन बघणारे - स्वतंत्र निरीक्षक आहोत, कीं एक 'भाग घेणारा' किंवा 'सहकारी खेळाडू' किंवा 'गुलाम-रोबॉट' ? हा निष्कर्ष त्यांनी सूक्ष्म अॅटोमिक पदार्थांच्या अभ्यासातून काढला आहे. सध्या आपल्याला विज्ञानाच्या त्या प्रयोगाकडे पहावयाचे नाही आहे किंवा त्यांतील अडचणी, तार्किक

अडचणी, मोजमापणीची पद्धती ह्या व इतर बारकाव्यांत शिरावयाचे नाही - 'वेळेच्या अभावी' - पण, त्यांनी नैराश्याने काढलेल्या मूलभूत प्रश्नाच्या 'जाणिवेबद्दल' चर्चा करावयाची आहे.

इलेक्ट्रॉन ह्या पदार्थाच्या ज्ञानाबद्दल जिज्ञासा व उत्सूक असणारे हे शास्त्रज्ञ स्वत:च्या अस्तित्वाबद्दल व त्या अस्तित्वाच्या व जगाच्या अस्तित्वाबद्दल एवढेच जिज्ञासू कां नाहीत ? ते क्षणभंगूर व मर्त्य जीवनच आहेत ना ? मग कुठल्या पद्धतीच्या ज्ञानाच्या प्रयत्नात ते गुंतले आहेत ?

वास्तविक, ह्या अफाट विश्वाच्या बाहेरील स्वतंत्र निरिक्षकाचा अधिकार वा स्थान त्यांना नाही. खरे तर ह्या विश्वाच्या निर्मीतीतीलच एक जीव असा असा एक फॉर्म त्यांना आहे. ह्या 'फॉर्म' मध्ये ते निसर्गाने केलेल्या नियमाप्रमाणे जन्म घेतात, 'जैविक वृद्धी' पावतात व मृत होतात. पण, त्यांच्या 'वैश्विक' जीवनाचा हा शेवट नव्हे !! पण, 'पाश्चात्य भौतिकवादी, निधर्मी विज्ञानाला' मात्र ह्या विश्वाच्या निर्मिती व व्यवहारामध्ये जी काही संयोजना, सातत्य व आखीव योजना दिसते ती ईश्वर निर्मित नाही व ती यंत्रवत डार्विनच्या उत्क्रांती तत्त्वाच्या 'म्यूटेशन' व सिलेक्शन 'पद्धतीने चालत रहाते, असा आग्रही सिद्धांत आहे. एव्हढेच काय तर ह्या विश्वाच्या गूढ निर्मीती व इतर प्रक्रिया ह्या कुठल्याही विचार संकल्पना, इच्छाशक्ती ह्यावर आधारलेल्या नसून एका भावशून्य, विचार, इच्छाशून्य अश्या गणीती शुष्क Equation किंवा Rules वर आधारुन चालतात, असा ठाम पक्षपाती विचार आहे. ह्या विश्वाच्या संकल्पने मागे काही **(ID) Intelligent Design** आहे. ह्या कल्पनेला त्यांचा कडवा विरोध आहे. ह्या कल्पनेला किंवा जिज्ञासेला ते 'वैज्ञानिक जिज्ञासा' म्हणावयाला तयार नाहीत. त्यांच्या दृष्टीने हा धर्मांचा (कुठचा धर्म ? ख्रिश्चन, इस्लाम-फक्त ?) मागल्या दाराने प्रवेशाचा कावेबाज प्रयत्न आहे.

**मीरा नंदाचा वैज्ञानिक पक्ष**

मी जो 'पाश्चात्य भौतिकवादी, निधर्मी विज्ञान' असा शब्दप्रयोग वापरते, तो ज्या अर्थाने आधुनिक लेखिका 'मीरा नंदा' ह्या सतत एका विवक्षित दृष्टीकोनाचा अत्यंत जोराने पुरस्कार करतात, त्या फ्रान्सिस बेकन, डेस्कार्त व न्यूटन ह्या शास्त्रज्ञांच्या परंपरेचा - 'वैज्ञानिक संप्रदायाच्या' बद्दलचा आहे. पण, पाश्चात्य संस्कृतीतही आधुनिक 'Post Modernist' वैज्ञानिक व इतर काही गट ह्या बंदिस्त दृष्टिकोनापासून दुरावत चाललेले आहेत. पण पूर्ण मूक्त नाहीत !! अजूनही एकांगी भौतिकवादाच्या भ्रमात आहेतच!!

आता आपल्याला ज्या विषयाचा विचार करावयाचा आहे तो हा की '(भौतिकवादी) धर्माच्या किंवा शुष्क 'रिच्यूअॅलिस्ट धर्माच्या' व 'संघटित धर्माच्या' (Organised Religion) व 'प्रॉफेटिक' धर्म (Christianity and Islam वगैरे) ह्यांच्या प्रभावाखाली असलेल्या समाजाच्या प्रभावा विरुद्ध ज्या न्यूटन, डेस्कार्ट ह्या शास्त्रज्ञानांनी फारकत घेऊन 'नवा वैज्ञानिक धर्म' स्थापन केला, त्याच्याच विचारधारेत समाजाने, राजकारणाने शिक्षणसंस्था व राज्यसंस्था स्थापल्या व आजही चालवत आहेत.

पण, आता ह्या सर्वांचा नवा आढावा घेण्याची वेळ आली आहे. नव्हे ती आतां अत्यावश्यक बनली आहे. कारण, ज्या घोडदौडेने समाजाच्या अध:पाताची वैयक्तिक नैतिक अध:पाताची - घसरण चालू आहे ती मानवी अस्तित्वाला घातक व धोकादायी आहे. खऱ्या व इतर ज्ञानमार्गांना इथे प्रतिबंध व मज्जाव आहे.

त्यावर वैदिक शास्त्रभाष्य काय आहे !

''In the 'Vedic View' the cosmic order is controlled by **a fundamental moral principle.** An eternal law or unity, which can be conceived as the principle of rightness or justice,

regulates all phenomena. This is called 'Rta' (ऋत), which means 'the fixed way or course', in other words, 'the settled order of things'. It governs the animate and the inanimate. As stated in Rg-Veda, "the whole universe is founded on 'Rta' and moves in it.

It keeps all things and beings in their respective courses. Conseguently, nothing deviartes from its own nature. Because of 'Rta' fire burns, wind blows, water flows, plants grow, **human being think,** and seasons revolve. Rta maintains regularity in the movements of sun, the moon, the planets and other lumineries.

It manifests itself as the universal law of causation, which finds expression in the Human plane as the law of karma. It establishes unity between the cosmic forces and the individual powers.

### भावपूर्ण नैतिक विश्वनियम व्यवहार

ह्या उताऱ्याचा हेतू, 'ऋत' या वैदिक संकल्पनेचा अर्थ जास्त स्पष्ट व्हावा, हा आहे. ह्या पृथ्वीवर 'मर्त्य' म्हणून जन्माला आलेल्या मानवाने, ह्या विश्वाच्या रचनेमध्ये अनंत काळपर्यंतही न बदलणारे असे कुठचे नियम वा तत्त्व आधारभूत आहे, याचा शोध घेतला. कुठल्याही प्रकारची आधुनिक यंत्रसामुग्री मदतीला नसताना, केवळ देहातीत, अतींद्रिय योगसामर्थ्याच्या जोरावर, या तत्वांची अनुभूती जाणवून घेतली. त्यांना, हे तत्त्व अविचल, चिरकाल टिकणारे व सर्वग्राही असे दिसले. त्या तत्वामध्ये केवळ भौतिक व्यवहारच नव्हेत, तर, सजीव, निर्जीव व अव्यक्त जगांतील सर्व व्यवहारांची नाती, संबंध, **न्याय**, **नैतिकता**, **सातत्य** व मूल प्रवृत्ती ह्यांची समीकरणे दिसली. ती समीकरणे भौतिक गणितांसारखी भावशून्य, निर्जीव व नैतिक व न्याय संकल्पनेबद्दलची उदासीन अशी दिसली नाहीत तर ह्या सगळ्या नात्यागोत्यांची संतूलना संभाळणारी, त्यांतील घटक अवयवांची उन्नती, प्रगती पोसणारी अशी दिसली. त्याला त्यांनी 'ऋत' असे नांव बहाल केले. भारतीय संस्कृतीत ह्या वैदिक दर्शनात सापडलेल्या **वैश्विक तत्वाला 'ऋत'** असे म्हणतात. ह्या संकल्पनेचा विशाल विस्तार हा वरील इंग्रजी उताऱ्यांत सामावलेला आहे, त्याच्या तुलनेने 'भौतिक विज्ञानाने' जी समीकरणे विश्व व्यवहाराची शोधली ती किती अपूर्ण, तोकडी, व कोरडी आहेत, हे लक्षात यावयाला हरकत नसावी.

### कोरडे विश्व गणतबद्ध ?

प्रश्न हा पडेल कीं 'भौतिक विज्ञानाची तत्त्वे ही गणित किंवा तत्सम शास्त्रात निबद्ध करुन सामान्य माणसाच्या जाणीवेच्या कक्षेत आणण्याचा प्रयत्न त्यांच्या पद्धतीच्या शिक्षणसंस्था करत आहेत.

### अतींद्रिय ज्ञान

मग 'ऋत' या अतींद्रिय जाणीवेवर अनुभवात येणाऱ्या संकल्पना सामान्य माणसांना कशा समजाव्या ? ह्याचे सरळ उत्तर आहे कीं ह्या पद्धती वैदिक काळात उपलब्ध होत्या. त्यांतील काही शेष व तुकड्या तुकड्यांनी आजही नमून्यादाखल अस्तित्त्वात आहेत. परंतु ही गोष्ट खरी कीं ही पूर्ण (सिस्टिम) पद्धती आज अस्तित्त्वात नाही.

याचे कारण फार गहन व संशोधनाला लायक आणि आवाहन करणारे, असे आहे. व्यक्ती व समाज ह्यांचे अध:पतन 'कलीयुगांच्या मूल्यांकडे' धावणारे हे एक मुख्य कारण आहे. नजीकच्या काळात मात्र राजकीय, परकीय संस्कृतीच्या आक्रमणाला हे 'श्रेय' द्यावे लागेल. त्यातच थोडक्यात ह्या 'ऋत' ज्ञानाला जी पात्रता व्यक्तीला व समाजाला नवनवीन पिढीला द्यावी लागते - त्या शिक्षणसंस्था, अनुकूल जीवनपद्धती, जीवनहेतू व योगिक, 'समाधिजन्य ज्ञानाच्या' पद्धती धूळीस मिळाल्या आहेत. त्या जिवंत करण्याचा हिमालयीन-भगीरथी प्रयत्न ह्या

संस्कृतीला मानणाऱ्या व त्या संस्कृतीला जिवंत ठेवण्याच्या निर्धाराला बांधलेल्या समाजाला पुन्हा एकदा जोमाने करावा लागणारा आहे. 'शिक्षण' ह्या विषयावर काय करावयाला हवे याचा हा एक थोडासा छोटा प्रस्ताव आहे. पण, ह्याची मूलभूत दिशा, ध्येय समजण्यासाठी मी आणखी काही उदाहरणे देणार आहे. त्यातून भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठ अश्या वैदिक ज्ञानपद्धती व मूलभूत समीकरणे यांची मांडणी करु या.

## तटस्थ निरिक्षक

आतां आपण पुन्हा जॉन व्हीलर यांना पडलेल्या प्रश्नांचा विचार करु या. त्यांचा प्रश्न असा आहे कीं माणसाला 'observer' ही भूमिका-म्हणजे तटस्थ निरीक्षकाची भूमिका खऱ्या अर्थाने आहे कां ?

अगोदर ह्या विश्वाचे तटस्थ, विश्वाच्या बाहेरुन किंवा भ्रमात्मक दर्शन कोण घेतो आहे ? इथेच दोन संस्कृतींमध्ये वाद आहे. भारतीय दृष्टीकोनात देह व इंद्रिये ही मर्त्य आहेत, पण आत्मा अमर आहे. त्यामुळे हे दर्शन आत्म्याचे व त्याच्याकरितां आहे. पण, ह्यासाठी ह्या देहबद्ध जीवाला 'मी कोण आहे' हा प्रश्न अगोदर सोडवायला हवा.

## ज्ञानाचा हेतू

याशिवाय अनेक मूलभूत प्रश्न ज्ञान, सत्य (Reality) ज्ञानाचा हेतू ज्ञान देण्याची प्रक्रिया, साधने, वगैरे बद्दल - तसेंच मानवी देहाच्या इंद्रियांच्या क्षमता, इंद्रियातील ज्ञान, स्पिरीच्यूअल प्रगती, 'वैज्ञानिक संप्रदायाच्या' ज्ञानाच्या सत्यतेबद्दलच्या भूमिका, विज्ञान कशाला म्हणावयाचे, ज्ञान कुणासाठी व्यक्तिसाठी, समाजासाठी, सगळ्या जीवमात्रांच्या उन्नतीसाठी, पृथ्वीच्या वरील जीवांच्या या विशेषत: फक्त मानवाच्या व्यावहारिक हेतुसाठी ? काय हेतू असावा ज्ञानाचा ?

## ज्ञानाचा संस्कृती संबंध

ह्या व इतर अनेक प्रश्नांबाबत अनेक जिवंत व मृत संस्कृत्यांमध्ये वेगवेगळ्या भूमिका आहेत. सध्याच्या आपल्या अभ्यासाच्या संदर्भात 'दोन संस्कृत्यांमधील' फरकाचा आपण विचार करत आहेत. एक आहे, प्रचलित 'सेक्यूलर पद्धति' पाश्चात्य संस्कृतीच्या 'प्रगतीच्या व्याख्येशी व व्यवहाराशी बांधलेली, निरीश्वर वादी, निधर्मी व मुख्यत: तत्कालिक राजकीय हेतूंना प्राधान्यं देणारी 'व्यावहारिक संस्कृति' व त्याच्या दूसऱ्या बाजूला, ज्या संस्कृतीला हिंदू वैदिक, सनातन संस्कृती म्हणता येईल, त्या आदर्शवादी संस्कृतीची बाजू !!

## ज्ञानाची पातळी व मानवी क्षमता

मुख्य फरक हा आहे की भारतीय संस्कृती दर्शनात 'सत्य' (Truth, Reality) हे अनेक पातळीवर चढत्या क्रमाने दृग्गोचर होते. व तसे बघण्याची व जाणण्याची क्षमता कमवावयाला लागते. विज्ञानाची सत्यज्ञानाची बघण्याची जाणण्याची क्षमता अत्यंत क्षीण व खालच्या पातळींची म्हणजे जवळजवळ प्राणी जीवाच्या पातळीची आहे. सदोष बुद्धीची आहे. सत्यदर्शन व अनुभूतीची नाही !!

## भौतिकवादी विज्ञानाची गुलामी व अंमल

सध्याची प्रचलित गौरवात रमलेली 'वैज्ञानिक दृष्टि' म्हणजे डेस्कार्ट व न्यूटन ह्या शास्त्रज्ञांनी घालून दिलेली प्रणाली होय. वैश्विक प्रक्रियेमधून Matter पदार्थ (जडपदार्थ) वेगळे काढून बाकी भाग Speculative निव्वळ वैचारिक, काल्पनिक व म्हणून त्याज्य - असा हा विचार होय. ह्याच धारणेत हेगेल पासून कार्ल मार्क्स ह्याने फारकत घेतली. Matter पासून Spirit वेगळे केले गेले. असे थोड्या ढोबळ पद्धतीने सांगता येईल. Philosophic idealism तत्वज्ञानातील कल्पनावाद, ध्येयवाद ह्यापासून ऐहिक भोगवादी, व्यवहारी मानवाने, विचारवंतांनी,

राज्यकर्त्यांनी फारकत घेतली व Scientific Materialism म्हणजे विज्ञानवादी भौतिकवाद ह्या कार्लमार्क्सने सांगितलेला वैश्विक दर्शनाला 'वैश्विक सत्यता' बहाल केली. त्यामुळे डेस्कार्ट व फ्रॉन्सिस बेकन ह्यांच्या, वैज्ञानिक दंभवाद आपण निसर्गावरचे सम्राट आहोत, निसर्ग आमचा गुलाम आहे, हा भ्रम दृढ झाला. आजही हा समाजमनावर, राज्यकर्त्यांवर, शिक्षणसंस्थावर दृढ होऊन बसला आहे. इकॉलॉजी, बायॉलॉजी व क्वांटम मेकॅनिकस् ह्या विज्ञानशाखेतीलच नवीन शाखातील संशोधनामुळे जरी ह्या भौतिकवादी सत्तेला ज्ञानाच्या भ्रमाला-विरोध होत असला, तरीदेखील निसर्ग व ईश्वरी अस्तित्वाबद्दल भौतिकवादी तत्वज्ञानात डुंबलेले राज्यकर्ते, शिक्षण शास्त्रज्ञ समाजाला ह्या भ्रमातच गुंतलेले पाहू इच्छितात हे दुर्दैव आहे. मग, वैदिक शिक्षणांत काय उपाय आहेत ?


## अरविंद भाष्य

ह्या संदर्भात महायोगी अरविंद यांचे इंग्रजी भाषेतील भाष्य मूळातच देतो इतके ते स्पष्ट आहे.

"The greatest power of the vedic teaching, that which made it the source of all later Indian philosophies, religions, systems of yoga, lay in its application to the **inner life of man.** Man lives in the physical cosmos subject to death and the 'much falsehood' of the **Mortal Existence** (मर्त्य जीवन) To rise beyond this death, to become one of the (मृत्यो र्मा अमृतं गमय), he has to turn from the falsehood to the Truth (सत्य); he has to turn to the light (तमसो मा ज्योतिर्गमय), and to battle with and to conquer the powers of the darkness. This he does by communion with the divine powers and their aid; the way to call down this aid was the secret of the vedic mystics. ...the way to immortality is the upward way of the Gods, the way of the Truth, a journey, an ascent by which There is a growth into the law of Truth, 'rtasya pantha' (ऋतस्य पन्था:)

## भौतिकवादी ज्ञानाची असमर्थता

त्यामुळे स्वत:च्या अस्तित्वाची 'सत्य' जाणीव नसलेला हा मानव वा वैज्ञानिक, जगाच्या खऱ्या सत्य जाणीवेपासून फार दूर आहे. ज्या भौतिकवादी तत्त्वज्ञान, निरीश्वरवादी तत्वज्ञान, भौतिकवादी बहिर्गत ज्ञानपद्धतीवर त्याचा विश्वास आहे त्याला खरे ज्ञान व जाणीव होणे अशक्य आहे.




चित्र नं. - २ Microscope Objective

पण, त्याउलट वैदिक ज्ञानपद्धतीत व ज्ञानाबद्दल आपल्याला जरी तुटक, अपूर्ण व पुस्तकी किंवा पांडित्यपूर्ण साहित्य उपलब्ध असले तरी त्याच्या ज्ञान व बोधाच्या पूर्ण प्रक्रिया हातात नाही आहेत. त्यामुळे आपल्या खऱ्या सांस्कृतिक पद्धतीत ज्या ज्ञानाच्या प्रक्रिया, साधने आपल्याला शिक्षण पद्धतीत सामील करावयाच्या आहेत. त्याबद्दल पुनरुज्जीवन, संशोधन व आधुनीकरण करण्याची नितांत गरज आहे.

## "भारतीय निद्रितावस्था"

पण, ज्या गलथान भोंगळ व बेजबाबदार पद्धतीने

(पृष्ठ क्र. १९वर)

# ब्रम्हा

*या महिन्यात भारतीय विज्ञान दिन आहे. त्यानिमित्ताने आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची विज्ञान कथा मुद्दाम प्रोत्साहन म्हणून देत आहोत. 'ब्रम्ह' हे शब्द 'ब्रह्म' असा व्याकरणिक दृष्ट्या असावयास हवा होता. परंतु तो लेखकाने वापरात तसाच ठेवला आहे. नोव्हेंबर २००५ मध्ये आमच्या महाविद्यालयात झालेल्या 'आईन्स्टाईनच्या तत्त्वप्रणाली' परिषदेच्या निमित्ताने त्याने विज्ञान कथा स्पर्धेसाठी सादर केलेल्या या कथेस पारितोषिक मिळाले होते. - संपादक*

**इ.स. २०८७ :**

भारताने सोडलेल्या पुष्पक अंतरिक्ष यानातील ते सहा शास्त्रज्ञ देवयानी (अॅण्ड्रोमिडा) तारका समूहातील कृष्ण- विवराचा (ब्लॅक होल) अभ्यास करीत होते या सहा शास्त्रज्ञांमधे गणितज्ञ ए श्रीनिवासन, अणुशास्त्रज्ञ प्रा. के. रामण्णा, खगोलशास्त्रज्ञ प्राचार्य चंद्रशेखर, विश्वरचनाशास्त्रज्ञ प्रा. एच. धवन हे चार भारताचे, जीवनशास्त्रज्ञ प्रा. ए. विक्रमसिंह हे श्रीलंकेचे तर रसायनशास्त्रज्ञ प्रा. वाय हॅरिऑट हे फ्रान्सचे शास्त्रज्ञ होते

'पुष्पक' हे भारताचे अतिप्रगत यान प्रकाशाच्या निम्म्या (५०%) वेगाने जाऊ शकत असे. संपूर्ण भारतीय बनावटीचे हे यान एअरोजेल पासून बनवलेले असल्याने ते वजनाने हलके होते तसेच ते उष्णता, धुळ, विश्वकिरण (कॉस्मिक रेज) यांपासून पूर्णतः सुरक्षित होते. यानाने आतापर्यंत वरुण (ओरायन), मत्रुरंग (सेंटॉरस) व व्याहा (सिरीअस) यांचा अभ्यास करुन बहुमोल माहिती मिळवली होती व ते आता पृथ्वीवर मिळालेल्या आदेशानुसार आपल्या आकाशगंगेप्रमाणे आकाशात देवयानी तारका समूहाकडे वळले होते. पुष्कळ दिवस कृष्णविवराचा अभ्यास करुन यान परतीच्या प्रवासाला निघाले. मोहीम यशस्वी. सर्वजण आनंदी होते.

अचानक 'पुष्पक'ला एक जबरदस्त हादरा बसला व यान वेगाने कृष्णविवराकडे जाऊ लागले. कितीही प्रयत्न केले तरी त्याचा वेग आटोक्यात येईना. त्याही परिस्थितीत प्रा. चंद्रशेखरानी यानातील दुर्बीण कृष्णाविवराच्या विरुध्द दिशेला रोखून दिसणाऱ्या प्रदेशाचा नकाशा संगणकाच्या सहाय्याने तयार करून त्याची पृथ्वीवरुन दिसणाऱ्या त्या भागाच्या नकाशाने तुलना केली व एकाएकी सर्व उलगडा झाला. सुमारे १०० वर्षापूर्वी २४ फेब्रुवारी १९८७ रोजी अवकाशनिरीक्षक इयान शेल्टनने मॅजेलान मेघातील सॅण्डुलीक ताऱ्याचा तारकास्फोट पहिला होता त्याच तारकास्फोटाने (सुपरनोव्हा) झालेले आयाती तरंग (शॉक वेव्हज्) व गुरुत्वीय लहरी (ॲक्रिशनल वेव्हज्) आता यानावर आदळल्या होत्या, व त्या बळामुळे यान वेगाने कृष्णविवराकडे ढकलले जात होते. मेघ पुष्कळ दूर होता. व त्याच्यापासून निघालेले आयाती तरंग व गुरुत्वीय लहरी आतापर्यंत लुप्त झालेल्या होत्या पण ययाती (पर्शिअस) तारकासमूहातील महाकृष्णविवराने (सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल) गुरुत्वीय भिंगाचे काम केले होते. त्याच्या प्रबळ गुरुत्वाकर्षणामुळे त्या लहरींचे केंद्रीकरण होऊन त्या एकत्र झाल्या होत्या व दुर्दैवाने पुष्पक त्या भिंगाच्या 'फोकस' च्या ठिकाणी होते. त्यामुळे जाणवलेला आघात अतिशय प्रबळ होता.

''आता आपला व आपल्या मोहीमेचा शेवट या कृष्णविवरातच होईल असे दिसते.'' प्रा. हॅरिऑट निराशेने म्हणाले.

''नाही,'' प्रा. एस चंदशेखर म्हणाले. ''आपल्याला अजून एक आशा आहे. मागील शतकातील गणितज्ञ

रॉजर पेनरोजच्या सिध्दांतानुसार कृष्णाविवरापासून ऊर्जा मिळवता येते. आपण कृष्णविवराच्या केंद्रापासून विशिष्ट अंतरावर असताना आपल्या यानाचे दोन भाग करून एक भाग जोराने कृष्णविवराकडे ढकलला, तर दुसरा भाग कृष्णविवराच्या कक्षेबाहेर ढकलला जाईल. कृष्णविवरापासून सुटण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.''

यान कृष्णविवराभोवती वेगाने फिरत होते. यानाची स्टॉक रुम रिकामी करून त्यावर रॉकेट जोडण्यात आले. संगणकाच्या सहाय्याने योग्य वेळी रॉकेट 'फायर' करून स्टॉक रुम कृष्णविवरात ढकलून कृष्णविवरापासून ऊर्जा मिळवून मुख्य यानाची सुटका केली जाणार होती. यान पृथ्वीच्याच दिशेने भिरकावले जावे अशा प्रकारे रॉकेट सोडण्यात येणार होते. पण तसे त्यांच्या नशिबात नव्हते.

यानाचा वेग पेनरोज कक्षेत येईपर्यंत प्रचंड वाढला होता. त्यामुळे संगणकाच्या सर्किटमधे विद्युतप्रवाह पोहोचण्यास काही मिलिसेकंदांचा उशीर झाला व यान पृथ्वीच्या दिशेने जाण्याऐवजी शर्मिष्ठा (कॅसिओपिया) तारकासमूहाच्या दिशेने जाऊ लागले.

लवकरच यान त्या समूहातील एका ग्रहमालेत जाऊन पोहोचले. विशेष म्हणजे त्या ग्रहमालेच्या केंद्रस्थानी तीन तारे एकमेकांभोवती भ्रमण करीत होते. साधारणपणे एकमेकांभोती फिरणारे दोन तारे (बायनरी स्टार्स) अनेक वेळा दिसतात पण या प्रकारचे तारे अतिशय दुर्मिळ असतात. त्या तीन ताऱ्यांपैकी एकाचे कृष्णविवरात रुपांतर झाले होते. पण इतर दोन ताऱ्यांचे वस्तुमान प्रचंड असल्यानेच त्यांचे कृष्णविवरापासून रक्षण झाले होते.

ग्रहमालेत ताऱ्यांपासून सुमारे १० खगोलीय एकक (अॅस्ट्रॉनॉमिकल युनिटस) अंतरावर एक ग्रह होता. गुरुहूनही मोठा असलेल्या हा ग्रह पृथ्वीसारखा दिसत असल्याने त्यांनी ग्रहाचे निरीक्षण करण्याचे ठरवले. ग्रहाचे वातावरण अगदी पृथ्वीसारखेच होते. ग्रहावरील वातावरणाचा थर जाड असल्याने ग्रहाचे दैवयानी तारकासमूहातून होणाऱ्या उल्कावर्षावापासून संरक्षण होत होते. ग्रहावरील वातावरणाचा खालचा थर कार्बन व नायट्रोजनच्या जड समस्थानिकांनी (आयसोटोप) बनला होता. ऑक्सिजनही थोड्याफार प्रमाणात उपलब्ध होता. बहुतेक ऑक्सिजनचा ग्रहावरील हायड्रोजनच्या ट्रिटियम समस्थानिकाशी संयोग होऊन जड पाण्याचे मोठे जलाशय तयार झाले होते. ग्रहावर माती व खडकांचे प्रमाण अत्यल्प होते. पाण्यात त्यांना खनिजांच्या खडकावर शैवाल आढळले पृथ्वीबाहेरील जीवसृष्टी असलेला पहिला ग्रह आपण शोधला याचा त्यांना अतिशय आनंद झाला. ग्रहाच्या निरनिराळ्या भागांतून त्यांनी पाणी, जमीन व शैवालांचे नमुने अभ्यासायला घेतले.

लवकरच त्यांच्या लक्षात आले, की तीन ताऱ्यांच्या प्रचंड गुरुत्वाकर्षणामुळे प्रकाशाचा वेग त्या ग्रहमालेच्या परिसरात सुमारे पन्नास टक्के कमी झाला होता. म्हणून प्रा. धवन म्हणाले.''पृथ्वीवर परतण्याअगोदर आपण येथील जीवसृष्टीच्या उत्क्रांतीचा अभ्यास करुया.''

''पण ते कसे शक्य होईल?'' प्रा.श्रीनिवासन म्हणाले,''उत्क्रांतीला तर लाखो वर्षे लागतील व आपण सध्याच्या ग्रहाचा पुरेसा अभ्यास केला आहे. आता आपण नवीन काय करणार ?''

प्रा. धवन म्हणाले,''या ग्रहमालेच्या परिसरात प्रकाशाचा वेग कमी आहे. जवळजवळ आपल्या यानाच्या वेगाएवढाच. आपण यानाने ग्रहभोवती काही प्रदक्षिणा करेपर्यंत ग्रहावर शेकडे वर्षे उलटून गेली असतील. सुदैवाने यानाचे इंधन घट सुस्थितीत असल्याने आपण या दोन ताऱ्यांपासून ऊर्जा घेऊ शकतो''

''पण या ग्रहावर जीवसृष्टी आली कशी व तिचे पृथ्वीवरील जीवसृष्टीशी इतके साम्य कसे?'' प्रा. रामण्णांनी विचारले.

''आपल्या मोहीमे अगोदरच्या मोहीमेत एक मानवरहित यान धूमकेतूवर आपटवून धूमकेतूचा अभ्यास करण्यात आला होता. माझ्या मते त्या टकरीमुळे धूमकेतूचा मार्ग बदलून तो या ग्रहावर आपटला असावा. टकरीच्या वेळी यानावर असलेल्या पृथ्वीवरील काही जीवाणूंनी धूमकेतूवर येऊन धूमकेतूच्या मार्गेच या ग्रहावर प्रवेश करुन जीवन निर्माण केले असावे.'' चंद्रशेखर म्हणाले. ''आपल्या या नव्या ग्रहाचे नाव काय ठेवायचे?'' प्रा. हॉरिऑटनी विचारले.

प्रा. धवन म्हणाले, '' भारतीय संस्कृतीत ब्रम्हाला सृष्टीचा जनक म्हटले आहे. या ग्रहावरही जीवसृष्टी उत्पन्न होत आहे. म्हणून माझ्या मते ग्रहाला 'ब्रम्हा' हे नाव साजेसे आहे. तसेच भारतीय खगोल निरीक्षक व्यंकटेश बापूजी केतकर यांनी गणिताच्या सहाय्याने प्लूटो व प्लूटोपलीकडील ग्रहाचा शोध लावून प्लुटोला 'ब्रम्हा' नाव द्यावे असे सांगितले होते. त्यांच्या सन्मानार्थ या ग्रहाचे नाव 'ब्रम्हा' ठेवावे असे माझे मत आहे.'' सगळ्यांनाच हे नाव पसंत पडले व नव्या ग्रहाचे नामकरण 'ब्रम्हा' असे करण्यात आले.

इकडे यानापासून संदेश येणे बंद झाल्यावर पृथ्वीवर एकच खळबळ उडाली. पण आता काहीही करणे पृथ्वीवरील शास्त्रज्ञांच्या हातात नव्हते. शेवटी यान कृष्ण विवरात सापडले असावे असा निष्कर्ष काढण्यात आला. पण तरीही शेवटचा उपाय म्हणून सर्व अंतराळस्थानकांना यानाची माहिती पाठवून यान परत आलेच तर त्या यानाला सर्व प्रकारची मदत करण्याचे आदेश देण्यात आले.

ब्रम्हावर प्रथम एकच भूखंड होता. हळूहळू त्याचे तीन खंडांत विभाजन झाले. सजीवांची उत्क्रांती चालू झाली. प्रा. विक्रमसिंहाच्या मर्गादर्शनाने सर्व शास्त्रज्ञांनी प्रत्येक कालखंडाचा संपूर्ण अभ्यास केला. चार्ल्स डार्विनच्या 'ओरिजिन ऑफ स्पेसीज्' चे समर्थन करणारे अनेक पुरावे त्यांना मिळाले ज्युरासिक कालखंडातले अवाढव्य डायनोसॉर्स व त्यांचे जीवन त्यांनी जवळून अनुभवले.

सर्व शास्त्रज्ञांनी ब्रम्हाचा एक नकाशा तयार केला. त्याचा अभ्यास करुन त्यांनी प्रत्येक खंडातील एक रुंद पर्वत निश्चित केला. त्या पर्वतांवर उतरुन शास्त्रज्ञ ग्रहाचे निरीक्षण करीत. त्या विचित्र ग्रहमालेत त्यांना अनेक चित्रविचित्र गोष्टी अनुभवास आल्या. दोन तारे असल्याने ब्रम्हावरील रात्र लहान होती. दिवस मोठा असल्याने वातारवण उष्ण होते. ब्रम्हाचा उपग्रहही बराच मोठा असल्याने ब्रम्हावरुन वारंवार प्रेक्षणीय ग्रहणे दिसत. भारतीय संस्कृतीत नारद हा ब्रम्हाचा मानसपुत्र असल्याने ब्रम्हाच्या उपग्रहाचे नाव 'नारद' ठेवण्यात आले.

याशिवाय ग्रहमालेत प्रकाशाचा वेग कमी असल्याने शास्त्रज्ञांना आईनस्टाईनचे सिध्दांत - जे पृथ्वीवर प्रयोगांनी तपासता येत नव्हते - ते तपासाता आले. मुख्य म्हणजे ताऱ्यांनी सोडलेल्या गुरुत्वाकर्षणाच्या प्रारणाचा अभ्यास करुन विशाल एकीकृत सिध्दांतात (ग्रँड युनिफाईड थिअरी) महत्वपूर्ण भर टाकता आली.

लवकरच ब्रम्हाजवळून एक मोठा ग्रह गेल्याने ब्रम्हाची कक्षा अस्थिर झाली व ज्युरासिक कालखंड संपला कारण वातावरणात वेगाने होणारे बदल डायनोसॉर्स सहन करु शकेल नाहीत. ग्रहावर हिमयूग चालू झाले. या कालखंडात पक्षी व सस्तन प्राण्यांत विकास झाला.

याचवेळी एक मोठा ग्रह ताऱ्यांच्या गुरुत्वाकर्षणामुळे शेजारच्या ग्रहमालेतून खेचला गेला व ग्रहमालेचा सभासद बनला. त्याच्या गुरुत्वाकर्षणामुळे ब्रम्हाची कक्षा स्थिर होऊन हिमयुग संपले. जीवसृष्टीला पोषक वातावरण निर्माण होऊन जीवसृष्टी झपाट्याने विकसित होऊ लागली. शास्त्रज्ञांचे सर्व सजीवांवर विशेषतः वानरांवर बारीक लक्ष होते.

हळूहळू मानवाच्या उत्क्रांतीला प्रारंभ झाला तो समूहाने राहू लागला. फक्त ब्रम्हावर दगड नसल्याने अश्मयुगाऐवजी एकदम धातूयुगास सुरुवात झाली. मानवाला अग्नीचा शोध लागला. अग्नीच्या प्रकाश व उष्णतेमुळे त्याचे जीवन सुसह्य झाले. कारण ब्रम्हा ताऱ्यांपासून बराच दूर असल्याने दिवसा वातावरण उष्ण असली तरी रात्री अतिशय थंड वातावरण असे.

लवकरच मानव शेती करायला शिकला. तीनही खंडांनी मानवाप्रमाणेच प्रगतीला सुरुवात केली. ब्रम्हावासीय जसजसे शास्त्राच्या पायऱ्या चढू लागले, तशी त्यांची हाव वाढू लागली. निसर्गच आपल्या ताब्यात असल्याचा अहंकार त्यांना झाला. निसर्गाची अमाप नासाडी होऊ लागली. बेसुमार जंगलतोड व पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे 'ब्रम्हा' उजाड होऊ लागला. ग्रह प्रचंड मोठा असुनही लोकसंख्या बेसुमार वाढल्याने जागेची टंचाई भासू लागली. निसर्गाच्या हानीकडे दुर्लक्ष होऊ लागले. शास्त्राचा उपयोग शस्त्रासाठी होऊ लागला.

हळूहळू तीनही खंडात युद्धे सुरु झाली. युध्दाचे रुपांतर महायुध्दात होणार अशी चिन्हे दिसू लागल्यावर शास्त्रज्ञ बेचैन झाले. काहींचे मत ब्रम्हावर आपण ढवळाढवळ करु नये असे होते तर काहींना 'ब्रम्हा' ला विनाशापासून वाचवावे असे वाटत होते. शेवटी मानवतेच्या दृष्टिकोनातून शास्त्रज्ञांनी ब्रम्हाच्या इतिहासातील पहिले महायुध्द टाळण्याचा निश्चय केला. सततच्या निरीक्षणातून त्यांना ब्रम्हावरची भाषा समजली होती. त्यांनी दोघा दोघांच्या गटाने पृथ्वीच्या वतीने तीनही खंडाच्या मुख्यांकडे जाऊन हे महायुध्द टाळण्याची विनंती केली. त्यांना पृथ्वीचे वर्णन सांगितले. ब्रम्हावासियांनी या शास्त्रज्ञाच्या विनंतीला मान देऊन महायुध्द थांबवायचे ठरवले. सहाही शास्त्रज्ञांचा ब्रम्हावासीयांनी सत्कार केला. त्यांच्यामार्फत पृथ्वीवरील बांधवांसाठी मैत्रीचा संदेशही पाठवला. कृतकृत्य मनाने शास्त्रज्ञांनी ब्रम्हाचा निरोप घेतला व पृथ्वीकडे प्रयाण केले.

पृथ्वीकडे परततांना त्यांनी आलेल्या मार्गावरुन अवलंब करायचे ठरवले. त्यांनी स्वतःहून यान कृष्णविवराकडे वळवले ते पेनरोज कक्षेत पोहचल्यावर यानाचे दोन भाग केले. पूर्वीचा अनुभव असल्याने यावेळी कोणतीही चूक न होता यान आपल्या आकाशगंगेच्या दिशेने ढकलले गेले. आपल्या सूर्यमालेच्या कक्षेत आल्यावर युरेनस व नेपच्युनच्या गुरुत्वकर्षणामुळे यान स्थिर झाले व पृथ्वीकडे निघाले.

प्रथम यान भारतीय अवकाश संशोधन संस्थेने गुरुच्या कॅलिस्टो उपग्रहावर उभारलेल्या अंतराळस्थानकावर उतरले व तेथून या सहा वीरांनी मोहीम यशस्वी झाल्याचा संदेश पृथ्वीवर पाठवला. तेथे काही दिवस विश्रांती होऊन ते पृथ्वीकडे निघाले. सुमारे दीडशे वर्षांनी ते पृथ्वीवर परतत होते पण यानातील घड्याळ मात्र मोहीमेला सुरुवात होऊन पन्नास वर्षेच झाल्याचे दाखवत होते. आईनस्टाईनच्या सापेक्षता सिध्दाताचा तो भक्कम पुरावा होता. नियोजित वेळी यान भारताच्या थुंबा अवकाश केंद्रावर उतरले. सर्व जगाकडून त्यांचे प्रचंड स्वागत झाले. शास्त्रज्ञांनी जीवसृष्टी असलेला नवा ग्रह शोधल्याची बातमी कळताच सर्वांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला. ब्रम्हावरील उत्क्रांतीच्या अभ्यासाने पृथ्वीवरील उत्क्रांतीला पुष्टी मिळाली. शास्त्रज्ञांनी महायुध्द थांबवून जीवसृष्टीचा नाश टाळल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदन व पुरस्कारांचा वर्षाव झाला. भारतीय अवकाश संस्थेने आपली पुढची मोहीम तारायुगल (बायनरी स्टार्स) असलेल्या हंस (सिग्नस× १) तारकासमूहाकडे पाठवण्याचे ठरवले. आपले विश्वातील दुसरे बांधव शोधण्यासाठी ...

अक्षय कुळकर्णी
S.Y.B.Sc.
(2005-2006)

•••

# अंधश्रद्धेचा विळखा

*श्रध्दा व अंधश्रध्दा यांच्या व्याख्येपासून ते तपशीलापर्यंत आपण नेहमीच विचार करतो. आपल्या मनातील 'जागत्या' विषयासंबंधी- संपादक*

श्रध्दा आणि अंधश्रध्दा यातील सीमारेषा अत्यंत धूसर असते. काय ही अंधश्रध्दा असे म्हणून कपाळ बडवून घेण्याने जेवढे बरे वाटते त्यापेक्षा कपाळ टेकवून 'उपेक्षू नको गुणवंता अनंता' असे म्हणणाऱ्याला हजारपटीने अधिक बरे वाटते यात शंका नाही. मानवी मनाला एक आधार शोधण्याची आणि त्याच्यावर भार टाकण्याची नैसर्गिक सवय आहे. फार पूर्वीपासूनच अखिल विश्वाचा सुत्रधार असलेल्या शक्तीची मानवाला जाणीव झालेली होती. आणि त्या 'चक्रपाणीलाच' आपण सखा करुन त्याचा आधार घेत जगण्याची पध्दती आत्मसात करुन घेतली. या शक्तीला शरण गेल्याने, तिची आपापल्या धर्मानुसार उपासना केल्याने एक आत्मिक समाधान, निश्चितता त्याच्या मनाला लाभू लागली. केवळ दैववादी राहू नये तसेच नुसत्या कोरड्या प्रयत्नवादानेही जीवन फुलणार नाही. हे समजल्याने प्रयत्नांना श्रध्देची जोड देण माणसाला आवश्यक वाटू लागलं. श्रध्दायुक्त उपासना म्हणजे भक्ती, ज्यामुळे त्या अगाध शक्तीच्या वर्चस्वाची जाणीव रहाते.

भगवंताची उपासना दृढ श्रद्धेने करणारे उपासक पूर्वीही होते. आजही आहेत. कितीही संकटे आली तरी 'सदा सर्वदा देव सन्निध आहे ! कृपाळुपणे अल्पधारिष्ट पाहे' हा भाव मनाशी पक्का असतो. नाहीतर आजच्या २१ व्या शतकात ऊनपावसाची स्वतःच्या प्रपंचातील वेदनादुःखाची कशाचीही पर्वा न करता लाखोंच्या संख्येने आषाढी कार्तिकी पंढरपूरच्या दर्शनाला जाणारे वारकरी दिसले नसते. वारकऱ्यांची निष्ठा, दृढ श्रध्दा कुणालाही नतमस्तक व्हायला लावेल अशी आहे.

खरे तर अत्यंत प्रगत अशा तंत्रज्ञानाच्या युगात सगळी भौतिक सुखं माणसासमोर हात जोडून उभी आहेत. जग इतके जवळ आलेले आहे की आपण अमेरिकेतल्या माणसाला घरबसल्या बघू शकतो, त्याच्याशी बोलू शकतो. अंतराळतला विहार तर कधीच सुरु झाला आहे. वैद्यकशास्त्रात कृत्रिम जीव जन्माला घालण्यापर्यंत प्रगती झालेली आहे. कौटुंबिक पातळीवर विलक्षण विसंवाद निर्माण झालले आहे. माणूस उत्कट आणि निरपेक्ष प्रेमाला दुरावले आहेत. अत्यंत स्वार्थी, अप्पलपोटी बनला आहे. नात्यागोत्याच्या आणि मोठेपणाच्या खोट्या कल्पनांचे ओझे बाळगताना थकून गेला आहे. या सगळ्या ओढाताणींचं, अस्वस्थतेचं मूळ कुठे असेल तर ते माणासाच्या मनातच आहे, ईर्षेत, लालसेत आहे. माणासाच्या मनातच धर्मक्षेत्र, कुरुक्षेत्र आहे. मग तो आसरा शोधीत हिंडतो आहे. मंगळवारी देवीच्या देवळात, गुरुवारी गजानन महाराजांच्या तर शनिवारी मारुतीच्या देवळात हिंडतो आहे.

गजानन महाराजांवर माझी निष्ठा आहे ते माझं कल्याणच करतील ही श्रध्दा. पण म्हणून बस स्टॉपवर उभे राहून 'गजानना' लवकर बस पाठवा असं उठताबसता त्यांना मदतीला बोलवणं याला श्रध्दा म्हणायचे का ? एका कुटुंबात सकाळपासून रात्रीपर्यंत प्रत्येकजण येता जाता देवाजवळ दिवा लावीत असतो. शंभरवेळा नमस्कार, पन्नासवेळा देवासमोर उभे राहणे, नाक घासणे, कान धरणे क्षमा मागणे असं चालू असतं. याला अंधश्रध्दा नाहीतर काय म्हणणार ? देवाला नवस करण्याची पध्दत प्राचीन काळापासूनच आहे. सर्व धर्मात आहे. मुंबईतील बांद्र्याच्या मेरीला मेणाचे अवयव वाहण्याचा नवस केला जातो.

दर्ग्यावर चादर घातली जाते. आणि हिंदूच्या तेहतीस कोटी देवांना अनेक प्रकारचे नवस केले जातात. या प्रवृत्तीचा फायदा घेऊन त्याला खतपाणी घालण्याचे काम पुजारी, बडवे, पुरोहित, ज्योतिषी पद्धतशीरपणे करीत असतात. आणि कुणी काही सांगितली आणि आपण केले नाही तर देवाचा कोप होईल या भीतीपायी माणूस ते अंधपणाने करीत असतो. याच्याच समांतर ज्योतिर्षांची विद्या काम करीत असते. गेल्या पाच वर्षात असे लक्षात येते आहे की, मध्यमवर्ग उच्चविद्याविभूषित असूनही ज्योतिष्यांच्या मागे लागत चालला आहे. ग्रहशांती, गृहशांती, रुद्र, महारुद्र, देवतांचे जप, कालसर्प शांती, नारायण नागबळी असल्या प्रकाराकडे अधिक ओढला जातो आहे. पत्रिका जुळत नाही, लग्न होत नाही, प्रांपचिक संकटं संपत नाहीत मग पत्रिका बघून असले उपाय केले जातात. हे उपाय करुनही दृष्टचक्र थांबतेच असे नाही. पण आपण ''दैवी प्रयत्न केले'' हे समाधान मानता येते.

माणसाला माणूस न ओळखता देव बनवण्याची वृत्ती घातक आहे. बुवाजींचे वेड म्हणजे धार्मिकता नव्हे. गरीब-श्रीमंत, हिंदू-मुस्लिम, नेते-अभिनेते, सुशिक्षित-अडाणी या सर्वांनाच बुवाजीने आपल्या पाशात गुंडाळले आहेत. गुरु व माँ यांच्या प्रभावाखाली राजकारणी, समाजकारणी, गुरु आणि गुन्हेगार याचे लगेबांधेही उजेडात येत आहेत. बुवाबाजी संपलेली नाही. तर मोठ्या प्रमाणावर जनसामान्यांना लुटणारे फसवे बाबा मांत्रिक, बुवा समाजात सापडतात. बुवाबाजीचा एवढा जबरदस्त पगडा माणसाच्या मनावर आहे की त्यातून बाहेर पडणे सहज शक्य नाही. माणूस चंद्रावर गेला तरी जमिनीवर मात्र अंधारच आहे. जुन्या चालीरिती बदलण्याची कुणाचीच तयारी नाही. देवाला व देवीला बोकड बळी देणे हे आजही खुलेआम सुरु आहे. कारुण्य, माया, ममता, प्रेम, कृपा हे सारे शब्द ज्या देवाजवळ आहेत तो कोणाचा बळी मागेल हे पटतच नाही. अणि त्यामुळे तो प्रसन्न होईल हेही पटत नाही. धर्माच्या नावाखाली जेव्हा अंधश्रध्देचा विकास होतो. किंवा ती फोफावते तेव्हा मनाला यातना होतात. विज्ञानयुगात संदेश देणारे आमचे काही नेते बुवांच्या आशीर्वादासाठी धडपडतात तेव्हा मन सुन्न होते. खरे तर राजकारण्यांना काय कमी असते ? सारी ऐश्वर्ये त्यांच्या पायाशी लोळण घेत असतात, पण तरीही ते बुवाबाजीला कवटाळतात. खेड्यापाड्यात बाबाबुवाचे समान्तर राज्य असल्याचे बरेचदा जाणवते. भोळ्याभाबडया खेडुतांचे हेच डॉक्टर असतात आणि भाग्यविधाते देखील ! त्यांना दवा, पाणी देण्याचा यांचाच हक्क असतो. त्याद्वारे ते समाजाला लुटतात. माणूस प्रगत झाला, पण प्रगत ज्ञान माणसांपर्यंत पोहचलेच नाही. त्यामुळे बुवांचे फावले.

इतिहासाकडे नजर टाकली तर दिसते की कुठल्याही धर्माच्या कुठल्याही संतांनी अंधश्रध्दा नष्ट व्हावी म्हणून कळकळीचा उपदेश केला आहे. तुकाराम महाराजांनी 'नवसे पुत्र होती ! मग का कारणे लागे पती', 'ऊस डोंगा परि रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥' अशा परखड विचारांनी समाजजागृती केली. संतशिरोमणी ज्ञानेश्वर माऊलीने समाजाचा जो छळ सोसला तो केवळ धर्माची घडी मोडू नये म्हणूनच. अन्यथा त्यांना चमत्कार करणे अशक्य होते का? माऊलीने आपल्या जीवनात फक्त तीनच वेळा चमत्कार केले. रेड्यामुखी वेद, पाठीवर मांडे भाजणे आणि भिंत चालवणे. या तीनही चमत्कारांनी त्यांनी इतरांचा उध्दार केला. बाकी सर्व आयुष्य समाजाची दूषणे सोसून धर्माची ध्वजा उंचावण्यात खर्ची पाडली. संत एकनाथांचे अवघे जीवनच अंधश्रध्देला दिलेला मोठा शहच होता. त्यांच्या घरी श्राध्दाला महार जेवले. त्यांनी गाढवाला पाणी पाजले. मानवता धर्म सर्वश्रेष्ठ धर्म असल्याचे उदाहरण घालून दिले. तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यांनी आपल्या भजन-कीर्तनातून अंधश्रध्दा निर्मूलनाचे केवढे मोठे काम केले आहे. गजानन महाराजांनी पेढे, बर्फी खाणाऱ्या विठोबा घाटोळाला दंडुक्याचा प्रसाद दिला होता. म्हणजे कुठल्याही संताने अंधश्रध्दा सांगितली नाही. पुढे ती अनुयायांनी स्वार्थापोटी वाढवली आहे. म्हणून अशा अंधश्रध्देपोटी,

चमत्कारांच्या मागे धावून अविवेकाने गेल्यास अंधश्रध्दा मानवाचा विळखाच ठरेल. अंधश्रध्देच्या चिखलात माणूस फसला की त्याची विचारशक्तीच नष्ट होते.

अंधश्रध्दा माणसाजवळ नकोच, पण श्रध्दा मात्र माणासाच्या मनात असलीच पाहिजे. कारण श्रध्दा आहे म्हणून पूज्यभाव आहे. मग तो परमेश्वराविषयी, थोरांविषयी, मायबाप, गुरुविषयी किंवा राष्ट्राविषयी कुणाहीबद्दल असो. श्रध्देमुळेच सगळ्या नात्यांना वात्सल्य आणि मांगल्याचा स्पर्श लाभतो. नुसत्या विज्ञानाच्या आणि बुध्दीच्या साहाय्याने जगताना जीवन यंत्रवत् आणि कठोर होऊन जाईल. कितीही म्हातारे, आजारी असले तरी ते माझे आईवडील आहेत ही भावना असणे महत्त्वाचे, ही भावनाच काढून टाकली तर जीवनाचा संवाद साधायचा कुठे? कसा? कुणाशी? भावना हे श्रध्देचे मूळ आहे. भावना अंतःकरणातील श्रध्दा-समर्पण या पातळ्यांवर मनुष्य परमेश्वरभक्तीत आध्यात्मिक विकास करुन घेऊ शकतो. तर समाजाप्रती याच पातळीवर जाऊन फार मोठे साजकार्य करु शकतो. गडचिरोलीचे डॉ. अभय बंग, डॉ. राणी बंग, बाबा आमटे आणि आमटे परिवार हे आजचे आदर्श असायाला हवेत. काय आहे या लोकांजवळ, फक्त मानवताधर्मावर नितांत श्रध्दा. शिवभावाने जीवसेवा, प्रयत्नांवर नितांत श्रध्दा. अशा श्रध्देतूनच समाजात नंदनवन फुलविले जाते. अंधश्रध्देच्या भ्रामक कल्पना माणसाला सारासार विचारशक्ती पासून दूर नेतात, स्वतःच्याच वैरी बनतात तर श्रध्दायुक्त अंतःकरणाने ज्ञानाचा दिवा अधिकच उजळून निघतो हे खरे. अशी परिस्थिती येण्यासाठी पुन्हा त्या 'सर्वात्मका सर्वेश्वरालाच' अनन्यभावाने शरण जावे लागणार.

**गीतेश गजानन शिंदे**
२०३, स्वप्नजा सोसायटी, धोबी आळी,
माचळी मंडळ हॉल जवळ, टेंभी नाका,
ठाणे (प)४००६०१.

(पृष्ठ क्र. १२वरून)

**भारतीय संस्कृति - बीज - मॉडेल - साधने**

'भारतीय संस्कृतीचे नगारे वाजवले जात आहेत, ते पहाता अजुनही हे प्रयत्न करण्याची खरी जाणीव नाही - सुरवात तर नाहीच नाही, असेच वाटते. संस्कृतीच्या भाटांना व प्रचारकांना ह्या श्रेष्ठ व वैश्विक संस्कृतीचा परिचय स्वतःलाच पूर्ण नाही - 'रहस्याचा व बीजाचा' तर नाहीच नाही!!

तरीदेखील, आजही या क्षणाला अजूनही काही प्रमाणात जिवंत असणाऱ्या या 'संस्कृतीतील ज्ञानाच्या संकल्पना' व 'जीवनाच्या दिशा' व त्यांना अनुकूल 'संस्कारक्षम शिक्षणपद्धती' यांच्या तुकड्या तुकड्यांनी जिवंत असणाऱ्या 'चीजा' आपण पाहू शकतो. त्यांचे एकात्म, Integral स्वरुप हे आपोआप ईश्वरीइच्छेने खुलं शकेल हे निश्चितच आणि अशी धारणा ठेवणे हेही अत्यंत योग्यत्वच आहे. पण प्रयत्नांची व संशोधनाची भरपूर आवश्यकता आहे. कोणत्या ह्या चीजा हे आपण पुढच्या लेखात पाहू या.

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन,
ठाणे - ४०० ६०१.
टेलि. २५३६८४५०
E-mail : yrsane@eth.net

•••

**विद्यार्थ्यांनी विज्ञान कथा पाठवल्यास त्यांचा नक्कीच विचार केला जाईल.**

**- संपादक**

# यश कसे मिळवाल

*यशस्वी कोणास व्हावेसे वाटणार नाही? यशाबद्दल हे थोडेसे चिंतन- संपादक*

आपल्याला एखाद्या बाबतीत यश मिळवायचे असेल तर प्रथम कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे याचा विचार करावा म्हणजे विद्यार्थ्याला परिक्षेत यश मिळवायचे असेल तर जसा तो अभ्यास करतो, अर्थात सतत, शिकवण्या लावतो, शाळेत निट लक्ष देतो. व एकच लक्ष मनात ठेवतो. तेंव्हा बुध्दीने कमी असलेले विद्यार्थी सुध्दा बरेच यश मिळवताना दिसतात. याच अर्थ कष्ट व मेहनत या गोष्टीला सुध्दा महत्व आहे हे लक्षात येते, त्याच प्रमाणे प्रत्येक कामात प्रामणिकपणे प्रयत्न केले असता यश आपलेच आहे. परंतु काही वेळा फसगत होते व यश आपल्याला वाकुल्या दाखवते याची कारणे शोधता आली पाहिजेत व त्या कारणांना पुढच्या कामात तिलांजली देता आली पाहिजे इतकेच नव्हे प्रत्येक कामाचा साकल्याने विचार केला पाहिजे. त्यातल्या कुठल्या सोप्या कुठल्या कठीण आहेत याचा ताळमेळ केला पाहिजे व कठीण गोष्टीवर मन केंद्रीत करुन त्यासाठी अधिक मेहनत घेण्याची तयारी पाहिजे व कामाच्या बाबतीत घाबरुन जाता कामा नये. कारण भीती हे सर्वस्वी आपल्याला खाऊन टाकते व कुठलेही काम हे आपल्या कार्यक्षेत्रात येते की नाही व हे काम इतर व्यक्ती किंवा प्रसिध्द व्यक्तीने कसे केले. त्यावेळी त्यांनाही आपल्या सारखीच परिस्थीती होती. याचा आढावा घ्यावा व बऱ्याच बाबतीत जो एक काम करु शकतो त्याच प्रमाणे ते काम इतरही करु शकतात. म्हणून त्या यशस्वी व्यक्ती व आपल्यात काय साम्य आहे व काय साम्य नाही याचा विचार करावा व ज्या गोष्टी आपल्यात कमी पडत असतील त्या वृध्दींगत करणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीत असामान्य शक्ती कार्यन्वीत असतात त्या शक्तीला योग्य ते खतपाणी घालुन वाढवता आले पाहिजे. व आपल्या अंगात असलेली अद्‌भुत शक्ती व त्याला योग्य शिक्षण या मिलापातुन सुंदरता जन्माला येते. व त्याचा योग्य वापर केला असता आपण जरुर यशस्वी होऊ. यश मिळवण्यासाठी प्रथम मनाची तयारी करणे आवश्यक आहे. मनाची तयारी करणे म्हणजे नेमके काय की आपला आपल्यावरील विश्वास वाढवायला शिकले पाहिजे. मनाला सवय लावुन घेणे व शक्य तो सर्व वेळ आपण यशस्वी कसे होऊ याबाबींवर दिला पाहिजे. थोडक्यात का होईना आपण झपाटलो गेलो पाहिजे. ध्यानी - मनी केवळ यश आपल्याला दिसले पाहिजे. मनी वसे ते स्वप्नी दिसे म्हणजे आपल्याला यशाचे स्वप्न पडले पाहिजे किंवा स्वप्नात देखील यश दिसेल. आपण फक्त यशाचा विचार न करता प्रामाणिक प्रयत्न केले. ते देखील हेतु न ठेवता. यश आपल्या दारी चालुन येईल. परंतु कुठल्याही अकस्मात मिळालेल्या यशामुळे आपण हबकून जाता कामा नये. आपल्या मनातील कुठल्या गोष्टी सहाय्यभुत ठरतात याचा आराखडा मनात ठेऊन त्याचा योग्यवेळी वापर करता आला पाहिजे. तसेच शांत-चित्त, शांत-वृत्ती बाळगता आली पाहिजे अशांततेची मनातुन हकालपट्टी करणे आवश्यक आहे. कुठलेही यश मिळवले तर त्यातील सर्व बाबी ठळकपणे आपल्या समोर आणणे आवश्यक आहे. व त्या यश मिळवण्याचा प्रयत्न जरुर करु व यश सुध्दा मिळवू हीच ईश्वर-चरणी प्रार्थना.

**प्रसन्न गोविंद कुलकर्णी**
५ हेमकुंज, झवेर मार्ग
मुलुंड (प) मुंबई - ४०००८०
फोन नं. २५६१२३८८

# ।। इये मऱ्हाटीचिये नगरी ।।

*बोली भाषेचा ऱ्हास झाला की भाषेच्या विकासाचे मार्ग बंद होतात, या भाषाशास्त्रीय तत्त्वाच्या पार्श्वभूमीवर २७ फेब्रुवारीस येणाऱ्या राजभाषा दिनाच्या निमित्ताने हा लेख - संपादक*

मानवी उत्क्रांतीच्या एका टप्प्यात भाषा या घटकाचा उगम झाला. भाषेचा प्रस्तुत हेतूच मुळात एकमेकांत संवाद निर्माण करणे हाच होय. 'भाष्' (आवाज निर्माण करणे) या मूळ धातूपासून निर्माण झालेल्या हा एक 'आवाजी' शब्द.

उत्क्रांती काळापासून ते आजमितीपर्यंतचा भाषाविज्ञानाचा प्रवास हा थक्क करणाराच आहे. आज जगात अगणित भाषा व कित्येक 'बोली' बोलल्या जातात. एकट्या हिंदुस्थानातच तब्बल अठरा प्रमुख भाषांना मान्यता मिळाली आहे.

याच भाषिक परंपरेतली एक अत्यंत समृध्द, संपन्न आणि शुध्द वाणी म्हणजेच महाराष्ट्राची राजभाषा 'मराठी'.

बहुतांश भारतीय भाषांचा उगम हा संस्कृतपासूनच झाला. परंतु त्यातही याच संस्कृत जननीला त्यातल्या त्यात जवळची भाषा म्हणून मराठीचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. शुध्द संस्कृतातून झालेला स्वतंत्र मराठी भाषेचा उगम प्रथमतः ज्ञानेश्वरी काळातच सांगितला जाऊ शकतो. परंतु त्याआधिच्या काळामध्ये सध्याच्या कर्नाटक राज्यात असलेल्या श्रवणबेळगोळ या ठिकाणी एका शिलालेखावर खालील शब्द आढळतात.

"श्री चावुंडराये करवियले ।
गंगाराजे सुत्ताले करवियले ॥"

मराठी भाषेतले हे पाहिले ज्ञात वाक्य होय. त्यानंतर मुकुंदराजांचे विवेकसिंधू आणिं महानुभवकालीन रचनांतून हा सृजनप्रवाह अखंड वाहत राहिला.

'शके बाराशे बारोत्तरे । ते टीका केली ज्ञानेश्वरें'

ही तर ज्ञानेश्वरीच्या कालखंडाची साक्षात पुराव्यानिशी साक्षच मानवी लागेल.

ग्रंथकर्तृत्व हे टप्प्याने वाढत जाते. मराठीच्या विकासाच्या कालाच्याच या निशाण्या होत. त्यामुळे ज्ञानेश्वरी - विवेकसिंधूंच्या पूर्वी वेदान्ताशिवाय कोणत्या ना कोणत्या स्वरुपात मराठी लोकभाषा अस्तित्वात असलीच पाहिजे. ज्ञानेश्वरीत आढळणारे शब्दचातुर्य, उपमांचे प्राचुर्य, भाषेचे सौंदर्य, कल्पनांचे प्रगल्भ अणि बुध्दिप्रामाण्यवादी दृष्टिकोन हे तात्कालिन भाषिक स्वरुपानुसार खूपच आधुनिक मानायला हवेत. हाच मराठीचा एका बाजूने बालपणीचा पण दुसऱ्या बाजूने प्रगल्भतेचाच काळ होय.

ज्ञानेश्वरीनंतर संत, तंत आणि पंत कवींनी मराठी भाषा नुसतीच समृध्द केली नाही तर ती आधिकाधिक लोकाभिमुख केली. राजकीय दृष्ट्याही शिवछत्रपतींपर्यंतच्या अत्यंत धकाधकीच्या कालखंडानंतर पेशवाईत मराठी भाषा, साहित्य, काव्य संगीत अक्षरशः समृद्धीच्या शिखरावर पोहोचले.

कालचक्राचा वेग हा ध्वनीच्या वेगापेक्षाही जास्त असतो असे म्हणतात. बदलत्या प्रवाहात मराठी भाषेमध्ये,

साहित्यामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली. केवळ भाषेच्याच नव्हे तर मराठी भाषिकांच्या कार्यकक्षांमध्येही प्रचंड विस्तार झाला. मराठी समाज विकसित झाला.

औद्योगिक क्रांतीचे परिणाम ज्याप्रमाणे अर्थकारणावर झाले त्या प्रमाणे समाजकारण, भाषाकारणावरही झाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे इंग्रजी भाषेचे प्राबल्य वाढू लागले. त्यातच इंग्रजी शिक्षण म्हणजे आधुनिक शिक्षण असा समज झाल्याने इंग्रजी भाषेचे शिक्षणातले आणि व्यवहारातले महत्त्व वाढले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषावार प्रांत रचनेनुसार झालेली मराठी राज्याची संरचना ही तर्कहीन आणि खुळचटपणाचेच द्योतक मानली गेली. त्याचा परिणाम सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांना आजमितीपर्यंत भोगावा लागत आहे.

**जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये इंग्रजी भाषेचं महत्त्व वाढल्याने अगदी प्राथमिक शिक्षणासारख्या मूलभूत घटकांधूनच मराठीला घरघर लागली.** वास्तविक पाहता इतर भारतीय भाषांशी तुलना करता मराठीची अवस्था हलाखीची असल्याचेच निदर्शनास येते. 'मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले' ही उक्ती तंतोतंत खरी करीत दोन मराठी माणसे एकत्र भेटल्यास हिंदीत संवाद साधतात अशी महाराष्ट्राच्या राजधानीतली आजची परिस्थिती आहे. महाराष्ट्रात मुंबई आहे परंतु मुंबईत महाराष्ट्र नाही हेच सत्य आहे. जेव्हा बोलीभाषेचा ऱ्हास होतो तेव्हा भाषेच्या विकासास आडकाठी येते हे तर भाषाविज्ञानाचे मुलभूत तत्व आहे. आजच्या बोली मराठीतले किती शब्द मराठी भाषेच्या अस्तित्वात आहेत हे शोधण्यासाठी स्वतंत्र 'महामंडळ' नेमावे लागेल. स्वा. सावरकरांनी फार वर्षांपूर्वीच भाषाशुध्दीची गरज स्पष्ट केली होती. पण आपणाकडील स्वयंघोषित बुध्दिवाद्यांकडून त्यांचे सगळेच विचार 'प्रतिगामी (?)' ठरविले गेल्यामुळे आज ही अवस्था निर्माण झाली.

महाराष्ट्रात रहणारा मध्यमवर्ग आणि निर्माण झालेला नवमध्यमवर्ग प्रामुख्याने 'आंग्लमराठी' युतीचा प्रवर्तक दिसतो. याचे प्रमुख कारण म्हणजे 'मराठी भाषा' नोकरी देऊ शकत नाही.

मग पुनःश्च भाषेच्या व्यवसायभिमुखतेचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. परंतु जागतिक चित्र असे सांगते की संशोधन क्षेत्रामध्ये आजही पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक कार्य हे इंग्रजेतर भाषांमध्ये प्रकाशित होते. स्पॅनिश, रशियन भाषेमध्ये झालेल्या संशोधनास जगमान्यता मिळालेली आहे. असे असताना मराठी संशोधक आपले संशोधन मराठीत का प्रकाशित करीत नाहीत. याचे प्रमुख कारण असे की अनेक शास्त्रीय संकल्पनांना मराठीत प्रतिशब्द नाहीत. ते निर्माण व्हावयास हवेत. परंतु विश्वकोश मंडळाचा अध्यक्ष योग्य की अयोग्य या विषयावर निरर्थक काथ्याकूट करण्यातच आमच्या विचारवंताची शक्ती, शब्द, आणि रकानेच्या रकाने वाया जात आहेत. वास्तविक पाहता विश्वकोश प्रकाशनाचे कार्य कधीच पूर्णत्वास जावयास हवे होते. परंतु या कार्यातही पारंपारिक पद्धतींना फाटा देऊन विश्वकोशाचे मुद्रण पूर्णपणे बंद करावे. या पुढील भाग हे इलेक्ट्रॉनिक स्वरुपातच प्रकाशित केले जावेत. यामुळे वेळ, पैसा आणि अद्ययावतता या सगळ्याचा सुवर्णमध्य साधता येईल. इंग्रजी ब्रिटानिकाच्या आवृत्यांप्रमाणे मराठीतही 'पुरवणी आवृत्या' काढणे शक्य होईल. वैज्ञानिक, तांत्रिक संकल्पनांना मराठी प्रतिशब्द शोधण्यासाठी संज्ञा कोश निर्माण करणे आवश्यक आहे.

मराठी ही ज्ञानभाषा आहेच. परंतु पूर्वपार वैज्ञानिक अधिष्ठान असलेली ज्ञानभाषा आहे.

उत्कट भव्य तेचि घ्यावे । मिळमिळित अवघे टाकावे।

निःस्पृहपणे विख्यात व्हावे । भूमंडळी ॥

या आणि या सारख्या व्यवस्थापन शास्त्राशी संबंधित अनेक ओव्या दासबोधात सापडतील. वनस्पतिशास्त्र,

बागकाम शास्त्र इ. विषयही समर्थांच्या विवेचनांतून सुटलेले नाहीत. ज्ञानेश्वरी आणि गाथेत तर पर्यावरण शास्त्राशी संबधित अनेक दाखले सापडतात.

आणि म्हणूनच ज्ञानभाषा मराठी आधुनिक विज्ञान भाषा कशी होईल या दृष्टीने कृती होणे आवश्यक आहे. मराठी का इंग्रजी ? हा प्रश्नच उद्‌भवता कामा नये. मराठी आणि इंग्रजी हे सूत्रच भविष्याची दिशा घडवील. आंतराष्ट्रीय स्तरावर कर्तृत्व गाजवलेल्या मराठी माणसांची यादी म्हटली तर जागा अपुरी पडेल.

महाराष्ट्रातील मराठी जनांचा एका मोठा वर्ग आज परदेशात विशेष करुन अमेरिकेत वास्तव्य करुन आहे. मराठी भाषा, संस्कृती शक्य त्या पध्दतीने ते तिकडे जतनही करीत आहेत. पण पुन्हा त्यांची पुढची पिढी ह्याची कितपत जाण ठेवेल याविषयी तेही साशंकच आहेत.

असो ! मराठी माणूस भूतकाळाच्या आठवणी चघळत बसतो असे म्हणतात. काही अंशी ते खरेही आहे. आधुनिक संकल्पनांची कास धरली तर 'अमृतातेही पैजा जिंके।' अशी मराठी पुन्हा एकदा संजीवन होऊ शकेल. भाषा विज्ञानानुसार कोणतीही भाषा कधीच लोप पावत नाही; तिचे रुप बदलू शकते. भविष्यात मराठीचे रुप बदलेल; स्वरुप नाही. मराठी ही लोकभाषा होती, राजभाषा आहे. परंतु बोलीभाषा म्हणून टिकेल की नाही ह्याची मात्र शाश्वती देता येत नाही. ती टिकायलाच हवी. नाही तर कवीवर्य माधवज्युलियन यांच्या शब्दांत बदल करुन 'मराठी असे आमुची मायबोली। जरी ती आज बोलीभाषा नसे' असे म्हणण्याची पाळी येऊ नये हीच एक अपेक्षा!

'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो कधीच धन्य ऐकतो मराठी
धर्म जात पंथ एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी'

- सुरेश भट

## संदर्भ सूची


१) कुलकर्णी, कृष्णाजी - मराठी भाषा : उगम व विकास, पुणे. मॉडर्न प्रकाशन, १९७३.

२) जोशी, लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश, खंड १२, वाई. म.रा.वि.महामंडळ, १९८५

३) कुलकर्णी कृ. पा. - मराठी व्युत्पत्तिकोश, पुणे. श्रीलेखन वाचन भांडार, १९६४

4) Tambwekar Waman - Sprinklings of Management from D asbodh., Mumbai Shri Ramdas Swami Trust, 2003



श्री. अमेय रानडे
सहा. ग्रंथपाल
मुलुंड वाणिज्य महाविद्यालय,
मुलुंड (प.) ४०० ०८०



दिशा
नियमित
वाचा


चित्रपालवी

# शिक्षण आणि कला

*आमच्या डॉ. बेडेकर विद्या मंदिर शाळेतील कला शिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांच्या चित्रकलाविषयक लेखमालेतील पुढील लेख - संपादक*


'चित्रपालवी' या बालचित्रकलाविषयक लेखमालेतील हा दुसरा लेखांक. या लेखात कला आणि शिक्षण यांच्यातील संबंधाविषयी विवेचन केलं आहे.

शिक्षण म्हटलं की आपल्या डोळ्यापुढे येते ती शाळा, शाळेतला अभ्यास, ते धडे, ते विषय, त्या परीक्षा, इत्यादी. मुलांचे शिक्षण म्हणजे हे असंच, अशीच आपली समजूत, कारण आपणही त्याच पद्धतीने शिकलेले असतो. पण हे शिक्षण म्हणजे खरे शिक्षण नसून प्रत्यक्ष जीवनाशी आणि व्यक्तिमत्त्व विकासाशी याचा काहीही संबंध नसतो, हे आपण लक्षातच घेत नाही.



शिक्षणाकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन फारच, संकुचित आणि मर्यादित स्वरुपाचा आहे. काही प्रतिभावान शिक्षणतज्ज्ञांच्या मते लिहिण्या वाचण्यापेक्षा शिक्षणाचे क्षेत्र कितीतरी विस्तृत आहे. केवळ बुद्धीविकासावर अधिष्ठित राहिल्यामुळे ते शिक्षण माणसाला माणुसकीपासून लांब ठेवतं आणि अशा शिक्षणातून माणूस हा केवळ बुद्धिवादी पशू बनतो. या पशुत्वापासून माणसाला जर मुक्त करायचं असेल तर त्याच्या बौद्धिक विकासाबरोबर भावनिक विकास होणं आवश्यक आहे. बुद्धिविकासातून बुद्धिमान राक्षस निर्माण होतो आणि मानसिक व भावनिक विकासाच्या जोडीनं मनुष्य निर्माण होतो. म्हणूनच कलेचा व शिक्षणाचा अतूट संबंध आहे.

मानसिक व भावनिक विकास क्रियेत स्वप्रकटीकरणाला तसेच आस्वादालाही फार महत्त्व आहे. स्व प्रकटीकरणाची तसेच दुसऱ्याचे प्रकटीकरण समजावून घेण्याची या दोन्ही क्रिया स्वाभाविक आहेत. यासाठी कोणतीही क्रिया कौशल्याने व्यवस्थित, सुडौल व संगतिपूर्ण करावयास शिकवणे अगत्याचे ठरते. इथे कलेचा व शिक्षणाचा संबंध येतो. परिणामकारक प्रकटीकरण हा शिक्षणातील महत्वाचा असा मूलभूत भाग. उदा. ज्याचा आवाज चांगला तो वक्ता किंवा गायक, मूर्ती करणारा शिल्पकार, प्रतिमा रेखाटणारा चित्रकार, शरीराच्या लयबद्ध हालचाली करणारा तो नर्तक इत्यादी. या प्रत्येकाला जाणीव, विचार तर्क, बुद्धी, स्मृती या गुणांची जोड लागते. या क्रिया नैसर्गिक आहेत. त्या परिणामकारक करण्याचे मूळ हे सौंदर्य दृष्टीत आहे म्हणजे कलेत आहे. म्हणून कला ही सर्व शिक्षणाचे मूळ. त्यामुळेच Art is the expression and creation of human insight असे म्हटले जाते. या प्रकटीकरणासाठी कोणी भाषेचे, कोणी रंग, रेषा आकारांचे तर कोणी स्वरांचे माध्यम वापरील. आज कलेची क्षितीजे मर्यादित झाल्याने शिक्षण व कला यात भिंत उभी राहिली. हर्बर्ट रीड म्हणतो, 'Art is the representation and science is the explanation of the same reality.' शिक्षणाचे एक नैसर्गिक माध्यम तसेच समतोल



व्यक्तिविकासाचे आवश्यक अंग म्हणून कलेचं महत्व आहे.

कला हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. कारण विद्यार्थीदशेत होणाऱ्या शिक्षणापैकी ८०% शिक्षण हे नजरेतूनच होत असते. म्हणूनच शिक्षणात दृक्साधनांस महत्त्व आहे. जेथे शब्द अपुरे पडतात तेथे रूप आणि आकार यांनी चटकन कार्य होते. म्हणून या मूळ निसर्गदत्त घटकांची जोपासना कलाशिक्षणात विशेषत: चित्रकला, मूर्तिकला व संगीतकला यात होते. म्हणून कलाशिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया हवा. कलाशिक्षणात बालकाच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिक विकासाला मदत होते. कला शिक्षणाचे तीन विभाग- प्रकटीकरण, निरीक्षण, आस्वाद. प्रकटीकरण ही क्रिया सुलभ व्हावी यासाठी तशी निकड, गरज व प्रकटीकरणाची भावनिक तयारी करते. निरीक्षण हे सरावानं, अभ्यासानं मिळवता येणारे कौशल्य आहे. आस्वाद ही क्रिया सज्ञान अवस्थेतील आहे. यासाठी बुद्धीची व तर्काची प्रगल्भता येण्यापूर्वी यातील विचारांचे मूळ, घटक असणाऱ्या बालकातील रंग, रूप, ताल, तोल, पोत या प्रकारच्या स्वाभाविक अनुभवांची वाढ केली पाहिजे. ही वाढ कलाशिक्षणात होते. म्हणून कला हे शिक्षणाचे नैसर्गिक माध्यम. असे केले तरच व्यक्तिमत्त्वाचा विकास समतोल होईल.

प्रत्येक माणूस एक कलाकार असतो. आणि प्रत्येकाची अभिव्यक्ती करण्याची पद्धत निराळी असते. ती अभिव्यक्ती करण्याची संधी त्याला कला शिक्षणात मिळत असल्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाला विघातक ठरणाऱ्या सहज प्रावृत्तिक अनिष्ट उर्मीचे उदात्तीकरण होतं व त्याचा कोंडमारा होत नाही. मनोविकासाचे एक प्रभावी साधन या दृष्टीने कला या विषयाचा अंतर्भाव शिक्षणामध्ये एक आवश्यक अंग म्हणून केला आहे. माणसातले माणूसपण टिकवण्यास ही कला मदत करते. Art should be the base of education. हा विचार शेकडो वर्षापूर्वी प्लेटो या तत्वज्ञाने मांडला. पण या विचाराकडे त्यावेळी व्यावहारिक भूमिकेतून न पाहता सुंदर कल्पनाविलास व पुस्तकी ज्ञान म्हणून पाहिले गेले. तरीही हे तत्वज्ञान शिक्षणशास्त्र या क्षेत्रातील आश्चर्य व ऐतिहासिक सत्य मानावे लागेल. यासाठी एक शैक्षणिक माध्यम म्हणून कला शिक्षणाचं महत्त्व जाणून घेतलं पाहिजे.

**सौ. मंजिरी दांडेकर**
मधु-मिलिंद बिल्डिंग, घंटाळी रोड,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : २५४१४५३९

### चुकीबद्दल दिलगिरी

जानेवारीच्या अंकातील

संपादकीयात

१) शीर्षकात प्रश्न चिन्ह नको.

२) पृ. ४०-परिच्छेद दोनमधे 'याचा अर्थ शहात्तर हजार तास... या वाक्यातील 'शहात्तर हजार' पूर्वी 'आठ लाख असे हवे होते.'

३) पृ. १५- 'धवधवा चालल्या लाटा धवधवा तोच आदळे' या वर्णना ऐवजी 'धबाबा चालल्या लाटा धबाबा तोय आदळे.' असे हवे.

या चुकांबद्दल दिलगीर आहोत.

पुस्तकपरिचय - १

# ॲडव्हान्सड् केमिस्ट्री

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील एक अनुभवी प्राध्यापिका सौ. गीताली इंगवले यांचे एक पुस्तक प्रकाशित झाले आहे. पुस्तकाचे नाव आहे. (ॲडव्हान्स केमिस्ट्री) "Advanced Chemistry" एव्हरेस्ट प्रकाशन यांनी ते प्रकाशित केले आहे.

हे पुस्तक दुसऱ्या वर्षाच्या केमिकलच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे. या पुस्तकातून पायाभूत केमिस्ट्री समजण्यास सोपी जाते. ऑरगॅनिक, इनऑरगॅनिक, फिजिकल, ॲनालिटिकल केमिस्ट्री यासंबंधीची माहिती या पुस्तकातून मिळते.

अध्यापनाचा अनुभव असल्याने या लेखिकेला विद्यार्थ्यांना काय हवे याची जाण आहे व त्याप्रमाणेच त्यांनी या पुस्तकाचे स्वरुप आखलेले आहे.



प्रा. सौ. गीताली इंगवले.
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे.

समजण्यास सोपी अशी या पुस्तकाची भाषा असून आणखी वैशिष्ट्ये म्हणजे प्रत्येक विषयाचा सारांश, येणारे प्रश्न, महत्वाच्या वैज्ञानिक संज्ञा आणि त्यांचे अर्थ ही आहेत.

या पुस्तकातील विषय पुढीलप्रमाणे आहेत, Organic Chemistry, Heterocylic Compounds, Alkanes, Alkenes, Alkynes, Cycloalkanes, Aromatic Compounds, Halogen Derivalives of Akane, Alcoholes & Phenols, Carboxylic Acids, Esters, Aldehyde, Ketones, Amines, Inorganic Chemistry, Phase Equilibrium & Phase rule, Adsorption, Solutions & Indicator, Analytical Chemistry & Chromatography.

एकंदर पुस्तकातील मांडणी विषयाची ओळख/ माहिती त्यानंतर त्या प्रकरणाचा सारांश, त्यावर आधारित असे सरावासाठी दिलेले प्रश्न अशी आहे.

विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला उपयुक्त असेच हे पुस्तक आहे त्याबद्दल प्रश्नच नाही. विषय सोपा करुन सांगण्याची हातोटी, समजण्यास सोपी अशी भाषा यामुळे हे पुस्तक विद्यार्थ्यांमध्ये मागणी वाढवेल.

पुस्तकाचे नांव - Advanced Chemistry

लेखिकेचे नाव - Mrs. Ingawale Geetali S.

प्रकाशकाचे नाव - Everest Publishing House

पुस्तकाची किंमत - रु. १४०/- फक्त

सौ. भारती अ. जोशी
तंत्रनिकेतनाचे ग्रंथालय

संपर्कासाठी -
सौ. गीताली इंगवले
औद्योगिक रसायनशास्त्र विभाग,
तंत्रनिकेतन, महाविद्यालय परिसर,
ठाणे.

# वृत्तपत्रातील वाचकांची पत्रे - सर्वेक्षण

वृत्तपत्रांचा वाचकांशी जिव्हाळ्याचा संबंध जोडणारे लोकप्रिय सदर म्हणजे वाचकांचा पत्रव्यवहार. सर्व वृत्तपत्रांनी वाचकांच्या पत्रव्यवहाराला खास महत्व दिले. एवढेच नव्हे तर संपादकांनी अग्रलेख, स्फूट लिखाण, विशेष माहितींच्या सदरांखालोखाल ''वाचक पत्रव्यवहार'' सदरांकरीता वीस ते पंचविस टक्के जागा राखुन ठेवलेली आढळते. नागरीकांना दैनंदिन जीवनांत वारंवार येणारे अडचणी, अडथळे आणि आपत्ति तसेच नागरी व ग्रामीण विभागातून उद्‌भवणाऱ्या समस्या ह्या सर्व वृत्तसंपादकाकडे वाचकांचे पत्रव्यवहार सदराकडे पाठवून द्याव्या लागतात.

वाचकपत्रव्यवहार विभागांत जमा होणारी पत्रे विभागवारीने जुळवून ठराविक कालखंडात त्यांना बऱ्याचदा एकत्रित प्रसिद्धी दिली जाते. उदा. नाले-गटारे साफसफाई करणे, पथदिवे बसविणे, कचराकुंडी व बसाहतीची स्वच्छता राखणे, सेनेटरी जोडणी दुरुस्ती, इ. असंख्य विषयांची पत्रे, सुचना आणि इशारे अशा मसुद्यांची पत्रांच्या सहनिशा करुन त्यानुसार कार्यवाही करुन घेण्याचा पाठपुरावा जबाबदार पत्रकार नित्यनियमांनी करीत असल्याचे सोबतच्या संकलनावरुन दिसून आले आहे.

वर्तमानपत्रांत पत्र लिहिल्याने आपले प्रश्न सुटल्याचे समाधान वाचकांना मिळाले आहे. त्यामुळे सुजाण नागरीकांत जागृति निर्माण केली जातेच; शिवाय वृत्तपत्राविषयी वाचकांचे मनांत ओढ आणि आपुलकी वाढल्याने, वृत्तपत्रांचा खप देखील वाढत असल्याचे सर्वकष सर्वेक्षणाअंती निष्पन्न झाले.

वाचक काहीना काही कल्पक सुचना, संभाव्य अपघातांच्या सुचना करतात. त्यांची योग्य ती कार्यवाही झाल्यावर धन्यवाद देणारी पत्रेही येतात. या सदराचे आणखी एक वैशिष्ट्य नमूद करावे लागेल की, नागरीक, वृत्तपत्रीय संस्था आणि शासन/स्वराज्य स्थानिक संस्था या सर्वांच्यात सुसंवाद साखळीच तयार होते. त्यामुळे वृत्तपत्रातील ''वाचक पत्रव्यवहार'' सामान्य नागरिकांना मुक्त व्यासपीठ आहे. याची जाण झाली. एवढेच नव्हे तर सामान्य वाचकांच्या दृष्टीने त्याचे पत्र प्रसिद्ध होणे, ही एक कौतुकाची बाब आहे असे मानले जाते.

वृत्तपत्र निर्मितीच्या प्रारंभापासून - म्हणजे मराठी वर्तमानपत्र ''दर्पण'' वृत्तपत्रकार कर्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या ह्या सुरवातीचे पहिल्या वहिल्या मराठी वर्तमान पत्रापासून वाचकांना दिलखुलास बोलते करणारे असे हे सदर समाविष्ट केले होते. मराठी वर्तमानपत्रांनी ही परंपरा आजतागायत चालु ठेवली आहे. त्यामुळे पुर्ण झालेली प्रकल्पे उद्‌घाटना अभावी धूळ खात न पडता, विनावापर विनाशाप्रत जाण्याकडे रोखली गेली, उद्‌घाटने - नामकरण विधी समारंभाखेरीज जनतेच्या वापराकरीता खुली करण्यात आली असल्याचा नुकताच अनुभव आला आहे.

सध्या सर्व वर्तमानपत्रे असे सदर देत असतात. त्यात प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रे अग्राडीवर आहेत.

**महाराष्ट्र टाईम्स** - बहुतांची अंतरे

**लोकसत्ता** - लोक मानस

**सकाळ** - वाचकांचा पत्रव्यवहार

**गावकरी** - जनमताचे प्रतिध्वनी

**लोकमत** - प्रतिबिंब

ही सर्व सदरे अग्रलेखाच्या पानावर देतात. ज्येष्ठ उप-संपादक ते संपादित करत आहेत. यावरुन त्याचे

जनमानसांतील स्थान आणि महत्त्व लक्षात येते. पुर्वी हे सदर तक्रारपेटी म्हणून दुर्लक्षित असायचे. ई-मेल च्या काळात त्याने सुचनापेटी म्हणून नाव लौकीक मिळविला आहे. हे सर्व श्रेय वृत्तपत्रांच्या जेष्ठ उपसंपादकांना जाते असे निदान स्थानिक स्वराज्य क्षेत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमान पत्रांच्या विविध आवृत्त्यांवरुन निष्पन्न होत आहे.

सदर अहवाल तयार करण्याकरीता मला सकाळ ह्या वृत्तपत्राचा विचार करावा असा वाटला, लोकसत्ता आणि महाराष्ट्र टाईम्स ह्या बड्या वृत्तपत्रा खालोखाल मुंबई प्रादेशिक विभागांतील सामान्य जनता ''सकाळ पुणे'' - ''सकाळ-मुंबई'' अशा आवृत्यांना अधिकाधिक प्राधान्य देत आहेत. दुसरे म्हणजे सदर वृत्तपत्र प्रादेशिक विभाग, मेगासिटी, महानगर ठाणे वृत्तांत, कल्याण - डोंबिवली वृत्तांत आणि अंबरनाथ बदलापूर अशी नगरपालिकांच्या विभागवार पुरवणी सादर करीत आहे. त्यांची आकर्षक रंगीत छपाई आणि सुटसुटीत आणि प्रौढ व्यक्तिसही चष्मांशिवाय वाचता येईल अशी सुलभ वाचनिय मुद्रण व्यवस्था अशी प्रमुख कारणे आहेत.

पत्रव्यवहारातील काही सुचक पत्रे- उदा - मिठाई खरेदी करा पण ... २) खबरदार जर ... ३) सावधान! फसू नका ! ४) ''सकाळ''शी सुसंवाद ५) मराठी पत्रकारीतेचा समृद्ध वारसा ६) डॉ. नानासाहेबांना मुजरा अशी विविध भाषा शैलीची सुचक पत्रे आणि काही ''लक्षवेधी '' उदा १) राष्ट्रध्वज वापराला आचार संहिता हवी, २) श्वास चित्रपट पहावा ३) ग्राहक संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी हवी ४) मंत्री हजर, सचिवच बेपत्ता ! ५) पाणी टंचाई असतांना टॉवर कसे उभे रहातात ? ६) अतिक्रमण हटविलेल्या जागांचे पुनरावलोकन हवे. अशी लक्षवेधी सुचना आणि इशारे वजा पत्रप्रपंचास प्राधान्याने प्रसिद्धी देत असतात.

वाचक हाच आपल्या बातम्यांचा स्त्रोत आहे. त्यामुळे बहुतांशी वृत्तपत्रांनी वाचकांच्या वसाहती मधून आपापल्या आवृत्ती; जनतेच्या प्रवाहात सामिल होऊन, जागृतिचा वसा कायम राखत आहेत. सोपी सुलभ भाषा; सुटसुटीत वृत्तपत्र रचना विविध स्तरावरुन समरस होण्याची किमया डॉ. परुळेकरांना पहिल्यापासून अवगत असल्याने पत्र लेखकांस आणि विषयांस अत्यूत्तम प्रतिसाद मिळत आहे. परिणामी वाद, कैफियत, असंख्य मतप्रकटीकरणांचे; बहूतांशी लक्षवेधी, आणि अनुभवी व्यवहारी सुचना पत्र व्यवहारांतून मांडण्यात येण्यास उत्तम व्यासपीठ म्हणजे ''वाचकांचा पत्रव्यवहार'' हेच सदर आहे. असे आम्हाला आत्मविश्वासाने कबूल करावे लागेल.

- माजी विद्यार्थी

## 'जागृती' वार्षिकांकाचं प्रकाशन

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या पत्रकारिता प्रशिक्षण वर्गातील दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'जागृती' या वार्षिकांकाचं प्रकाशन नुकतचं ठाण्याचे पोलीस आयुक्त डी. शिवानंद आणि महापालिका आयुक्त संजय सेठी यांच्या हस्ते करण्यात आलं. बांदोडकर कॉलेजमध्ये झालेल्या या समारंभास विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष करंदीकर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, श्री. दिलीप जोशी व प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर उपस्थित होते.

पुस्तकपरिचय-२

# जग बदलू पहाणारांचे जग

हंगेरीमध्ये कोणी एक एर्झसेबेट त्झेकेरस नावाची महिला असते. अपंगाकरिता झपाटून समर्पित भावनेने आपले जीवन अपंगांनी जगण्याच्या प्रयत्नांसाठी जगते. वीस एकवीस केंद्रांचे देशभरजाळे निर्माण करुन त्यातून व्यवसाय संधी, व्यावसायिक शिक्षण पुरवून अपंगांना स्वयंपूर्ण करण्यासाठी ती काम करते. या कामामागची तिची प्रेरणा कोणती, यासाठी तिला मदत करणारी माणसं कोण, तिच्या या कामातून जग बदलू शकणार आहे काय ?...

अशीच एक झपाटलेली झंझावती काम करणारी बाई बालकांच्या संरक्षणासाठी आयुष्यपणाला लावते. क्षणाक्षणाला मुंबईतील झोपडपट्या, कामगार वस्त्या तिच्या संस्थेला मदतीसाठी हाक मारतात, मदतीची अपेक्षा करतात. जेस बिलिमेरिया या बाईने उभारलेली बालसंरक्षणाची ही विलक्षण कहाणी 'चाईल्ड लाईन' या तिच्या संस्थेच्या रुपाने साकारते. १९९६ला मुंबईत सुरु झालेल्या या चाईल्ड लाईनचा अवघ्या तीन चार वर्षात तीस शहरात विस्तार होतो हे कसं घडतं ? या बाईला अडचणी येत नाहीत का ?

तिकडे द. आफ्रिकेत एडस्ग्रस्तांना दिलासा मिळेल असं प्रचंड काम करणाऱ्या व्हेरोनिका खोसा आहेत. त्यांनी या रुग्णांसाठी इतकं केलं आहे की त्यांना ''ममा खोसा'' म्हणूनच लोक ओळखतात. प्रिटोरिया जवळील मामेलेडी सारख्या नगरीत हे काम उभं करताना त्यांच्या मनात निराशेचे क्षण डोकावलेच नसतील का ? या बाईंनी पावलोपावली येणारी ही आव्हान कशी पेलली असतील ?... ही कहाणी आहे.

आपल्या कामातून जग बदलायला निघालेल्या, अफाट स्वप्ने पाहणाऱ्या आणि कष्टांचे व्रत घेतलेल्या देवदूतांची ! एखादे शिवधनुष्य उचलावे तशी मोठमोठी कामे करण्याची ही उमेद यांच्यात येते कशी, यासाठी त्यांच्या आयुष्यात वळणे येतात तरी कोणती हे समजावून घ्यावयाचे झाल्यास सामान्य वाचकापासून ते शासनकर्ते, संशोधक यांनी दखल घ्यायला हवीच आहे पुस्तक म्हणजे ''How to change the World: Social Entrepreneurs and their power of ideas'' ! सामाजिक उद्योजकांबाबत व उद्योगाबाबत असणारे हे पुस्तक लिहिले आहे David Bornstan यांनी. वरील उदाहरणातून आलेल्या सामाजिक उद्योजकांबरोबरच त्यांच्या मानसिकतेचा विचार करणारे लेख हे या पुस्तकाचं खास वैशिष्ट्य !

सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या या जगावेगळ्या माणसांच्या कामाचा व्याप इतका वाढला की त्यांचे समाजासाठी केलेले हे काम हाच एक मोठा उद्योग बनला आहे. सोशल एण्टरप्र्यूनरशिप या संकल्पनेचे सामाजिक उद्योजकता हे रुपांतर असे आहे की त्यात बिझनेस ही आहे. सामाजिक संस्था अपयशी ठरण्याच्या काळातील हे सामाजिक परिवर्तन आहे. या विषयाचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश व्हावा इतकी त्याची व्याप्ती वाढली आपल्याकडेही एस्. पी. जैन व्यवस्थापन संस्थेतील कॉर्पोरेट सोशल रिस्पॉनसिबिलीटी हा अभ्यासक्रम आणि या विषयाचा स्वतंत्र विभाग, आणंद येथील हमी या संस्थेतील Rural Development हा विषय ही उदाहरणेही सामाजिक उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील महत्वाची उदाहरणे ठरावीत ! सामाजिक तत्त्वज्ञानाच्या प्रेरणेतून होणारी कामे, त्यातून कार्पोरेटने केलेले साहाय्य आणि आता सामाजिक आव्हानांचाच उद्योग अशा टप्पातून ही सामाजिक उद्योजकतेची कामना पुढे आली आहे.

जबरदस्त परिवर्तन क्षमता हे या माणसांचे खास वैशिष्ट्य ! माणूस देशाचा नागरिक तर आहेच पण त्याही आधी तो जगाचा नागरिक आहे हा विचार ही मूळ धरत असल्याने या माणसांच्या या कामांना या रुढ सीमा रेषांचे बंधन नाही. थिंक ग्लोबली अँड अॅक्ट लोकलीया ऐवजी थिंक अँड अॅक्ट ग्लोबली ही या माणसांच्या कार्याची गरज ठरत आहे. ही सकारात्मक काम करणारी माणसं भलेही प्रसिद्ध उद्योजक राजकारणी मंडळी नसतील. या प्रसिद्धीच्या वलयाअभावी त्यांची कार्ये थांबली नाहीत कोणी पत्रकार आहेत, कोणी शिक्षक, कोणी नर्सेस तर कोणी डॉक्टर्स या सर्वांच्या अस्तित्वाचा हेतू समान आहे, तो म्हणजे जग बदलायचा प्रयत्न करीत रहाणे, अव्यवस्थेतून व्यवस्था निर्माण करणे !

आपल्या कार्यातून इतिहासावर ठसा उमटवू शकण्याची जबरदस्त क्षमता असणारी (Scratch on History) ही जगाच्या कानाकोपऱ्यातील माणसं शोधावीत या प्रेरणेतून १९८० साली बिल ड्रायटनने ''अशोका इनोव्हेटर्स फॉर द पब्लिक'' ही संघटना सुरु केली. बिल ड्रायटन चा भारतीय इतिहासाचा साक्षेपी अभ्यास आणि समृद्ध जाण या संघटनेची माहिती पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणात (फॉम लिटल अॅक्रॉनस टू ग्रेट ट्रीज ग्रेड) आहे. जनहितार्थ अनेक प्रकल्प राबविणारा सम्राट अशोकाच्या नावावरुन हे नाव आलं. या ड्रायटनचे आदर्श म्हणजे म. गांधी व विनोबा भावे. या संघटनेच्या माध्यमातून जग बदलू पाहणाऱ्या वरीलप्रमाणे एकांड्या कोलंबसांचा ड्रायटनने शोध घेतला. अमेरिका, युरोप आशियासह सर्व जगभर असे झपाटलेले काम करणारे असतात. अशांच्या कार्याच्या प्राथमिक अवस्थेत ड्रायटनच्या या संघटनेने अशोका फेलोशिपच्या माध्यमातून मदत केली, अजूनही मदत करणे चालू आहे. आज असे प्रयोगशील असणारे १५०० सामाजिक उद्योजक अशोका फेलोशिपचे लाभार्थी आहेत. या फेलोजूची होणारी निवड याबाबत या प्रकरणात जे वाचायला मिळते त्यावरुन या निवडप्रक्रियेबाबत असणाऱ्या शकांचे निरसन करणारे आहे.

उपसंहार करताना लेखकाने Goethe चा एक सुंदर विचार सुरवातीला दिला आहे. Things which matter most must never be at the mercy of the things which matter least ! आणि नंतर ११ सप्टेंबर २००१ ची उध्वस्त मनोवस्था आणि जबरदस्त आशावादी माणसांची लिहावयाची ही गाथा याबद्दल ब्रॉनस्टीन जे लिहितात ते मुळातून वाचावे असे आहे.

तंत्रज्ञानाच्या रेट्यामुळे बदलणारे जग, जवळ येणारे पण मने दुरावणारे जग, दहशतवाद, भ्रष्टाचार, प्रदुषणादि असंख्य प्रश्नांनी गांजून गेलेले जग एकीकडे आणि सामाजिक उद्योगाचे हे हिमालय दुसरीकडे, शासनव्यवस्था तर झपाट्याने प्रभावहीन बनत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर यातील उद्योजकांचा प्रवास समजावून घेतला तर समाज म्हणून आपण अजूनही कसे टिकून आहेत याचे कोडे उलगडेल ओघवती भाषा, विषयाची मांडणी यामुळे सदर ग्रंथ अत्यंत वाचनीय झालेला आहे. आवश्यक तेथे संदर्भ दिल्याने ग्रंथाचे संदर्भ मूल्य ही वाढले आहे. सर्व भारतीय भाषांमध्ये भाषांतर होऊन भारतातील सर्व भाषांत पोचावे असा हा ग्रंथ आहे. आदर्शाची आणि मूल्यांची वानवा आहे असे म्हणणारांनी तर हा ग्रंथ वाचायलाच हवा !

How to change The World : Social Entreprenaurs and the power on Ideas.
- David Bornsiein
- London, Penguin Books, 2004, 2005
- ISBN - 0-14-303252-6
मूल्य रु. ३९५/-

**प्रा. मोहन पाठक**
ग्रंथपाल
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

# परिसर वार्ता

## विद्या प्रसारक मंडळ ठाणे आयोजित

## कै. जानकीबाई गोखले गीतापठण स्पर्धा

*सदर वृत्तलेख जुन्या घटनेवरील असला तरी त्यातील भौतिक विचार दिशाच्या वाचकांपर्यंत पोचावेत यास्तव आमचे स्नेही श्री. शरद सोनार यांच्या सौजन्याने 'दिशा' मध्ये पुनर्मुद्रित करीत आहोत - संपादक*

मागील वर्षापासून विद्याप्रसारक मंडळ या ठाण्यातील सुप्रसिद्ध शिक्षण संस्थेमार्फत कै. जानकीबाई गोखले यांच्या स्मृतिप्रित्यर्थ गोखले कुटुंबियांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी 'गीतापठण स्पर्धेचे' आयोजन करण्यात येत आहे. ह्या वर्षी दि. २ ऑक्टोबर रोजी डॉ. बेडेकर विद्या मंदिर ठाणे येथे ह्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ह्या स्पर्धेत ठाण्यातील चार-पाच शाळांतील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. इ. ३ री ते ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी गीतेचा १६ वा अध्याय तर इ. ७ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या गटासाठी गीतेचा १७ वा अध्याय पठणासाठी ठेवण्यात आला होता. सकाळी ९ ते ११ या वेळेत स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यानंतर लगेचच स्पर्धेत यशस्वी झालेल्या व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना, पारितोषिके व प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी व विद्यार्थांचे कौतुक करण्यासाठी पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन ए.के.जोशी विद्यालयाचे सभागृहात करण्यात आले होते. ठाण्यातील नामवंत डॉक्टर तथा वैदिक ग्रंथांचे -मंत्रांचे अभ्यासक श्री. शांताराम आपटे यांचे हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. वरील दोन्ही गटात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या दोन विद्यार्थ्यास प्रत्येकी २५०रु., द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास प्रत्येकी १५० रु, तृतीय क्रमांकास प्रत्येकी १००रु. तर दोन-दोन यशस्वी स्पर्धकांस उत्तेजनार्थ प्रत्येकी



गीतापठण पारितोषिक वितरण समारंभास उपस्थित पाहुणे - सौ. अल्पना बापट, मा. य. गोखले, डॉ. शांताराम आपटे, श्री. वि. करंदीकर, शं. बा. मठ

५०रु. अशी रोख रकमेची पारितोषिके व प्रमाणपत्रे बहाल करण्यात आली. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांस नंतर सहभागाबद्दल प्रमाणपत्रे देण्यात आली. ह्या पारितोषिक समारंभाचे मंचकावर ह्या वेळी वैदिक ग्रंथांचे व संस्कृतचे अभ्यासक श्री. शं.बा.मठ, वि.प्र.मंडळाचे अध्यक्ष श्री. श्री.वि.करंदीकर, मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले स्पर्धेच्या संयोजिका सौ. अल्पना बापट हे मान्यवरही उपस्थित होते.

समारंभाचे सुरुवातीला सौ. अल्पना बापट यांनी मंचकावरील मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नंतरच्या आपल्या प्रास्ताविकात त्या म्हणाल्या, "वि. प्र. मंडळ" आयोजित करीत असलेल्या या गीतापठण स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. कै. जानकीबाई गोखले यांना गीतेची फार आवड होती. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ गोखले कुटुंबियाचे सहकार्याने वि.प्र.मंडळ या गीतापठण स्पर्धेचे आयोजन करीत असते. गोखले कुटुंबियांनी त्यासाठी मंडळाकडे काही

ठेव ठेविली आहे. गीता हे भारतीय तत्त्वज्ञानाचे सार आहे. लहान वयांत पाठांतर केले तर ते चिरकाळ टिकते'' असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकानंतर फार पूर्वीपासून ठाण्यात राहणाऱ्या कै. जानकीबाई गोखले यांच्या कन्या सौ. सुनंदा वैद्य (पूर्वाश्रमीच्या सुमन गोखले) यांनी आपली आई जानकीबाई यांच्या संबंधी थोडक्यात माहिती सांगितली. त्या म्हणाल्या. ''जानकी यशवंत गोखले'' हे आमच्या आईचे पूर्ण नाव. तिचा जन्म १९०७ चे सुमारास जमखंडी येथे झाला. तिचे वडील रोज गीता म्हणत असत. ते ऐकून लहानपणापासूनच आईही गीता म्हणू लागली. तिला तो छंदच लागला व सर्व गीता तोंडपाठ झाली. आमचे वडील जमखंडीच्या सरकारी दवाखान्यात नोकरीला होते. त्यांच्या मृत्यूनंतर आईला कुटूंब निवृत्तीवेतन मिळत असे. पुढे ती ठाण्यात आल्यावर रामवाडीतील दत्त मंदिरात गीतापठण करु लागली. एका मैत्रिणीच्या सहकार्याने तिने एक 'गीता मंडळ' स्थापन केले. १९९३ साली आईचे देहावसान झाले. ह्या गीता मंडळ स्थापनेस आता ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. पण अजूनही ह्या मंडळात दर एकादशीला गीतापठण होते, गीताजयंती साजरी केली जाते, प्रवचने होतात. आई परोपकारी वृत्तीची असल्याने तिच्या मृत्यूनंतर तिच्या इच्छेनुसार 'तिचे नेत्र दान' करण्यात आले. 'हरीला आवडते तुळशीचे पान' हे आईचे आवडते भजन. सौ. नामजोशी यांचे घरी होणाऱ्या भजनी मंडळात आवर्जुन म्हटले जाते. तिच्या स्मृतीप्रित्यर्थ ह्या गीतापठण स्पर्धेच्या कार्यक्रमाला आमच्या गोखले कुटुंबियातर्फे आर्थिक सहकार्य देण्यात येते.

ह्या नंतर कै. जानकीबाई गोखले यांचे चिरंजीव तथा वि. प्र. मंडळाचे कोषाध्यक्ष व ठाणे भारत सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून सर्व ठाणेकरांना सुपरिचित असलेले- श्री. मा. य. गोखले यांनी पाहुण्यांचा थोडक्यात परिचय करुन दिला. डॉ. आपटे यांचा परिचय करुन देतांना ते म्हणाले, '' डॉ. शांताराम आपटे वेदाभ्यासक तथा ठाण्यातील एक नामवंत डॉक्टर म्हणून प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रात जे मोजकेच विद्वान आहेत त्यात डॉ. शांताराम आपटे यांचाही समावेश आहे. दुसरे पाहुणे श्री. शंकरराव मठ हेही वेद तथा धार्मिक ग्रंथाचे अभ्यासक म्हणून ठाणेकरांना सुपरिचित आहेत.

श्री. गोखले पुढे म्हणाले **''गीतेचा अभ्यास जेवढा भारतात होतो त्यापेक्षा अधिक अभ्यास इतर देशात होतो. ठाण्यात अनेक ठिकाणी गीतापठण होत असते. ह्या सर्व गीताप्रेमींना एकत्र बोलावून त्यांचे संमेलन घेतले पाहिजे. शिक्षकांनाही गीता शिकवावी. गीतेत व्याकरणाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केलेले आहे !''**

नंतर गीतापठण स्पर्धेच्या परिक्षक श्रीमती मंदा बापट यांनी प्रतिनिधिक स्वरुपाचे स्पर्धेसंबधी अनुभव कथन केले. ''गीता म्हणतांना भाषा शुद्ध असेल तर ती लोकांना ऐकाविशी वाटते'' असे त्या म्हणाल्या

नंतर प्रमुख पाहुणे डॉ. शांतराम आपटे आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणात म्हणाले ''जीवनात काय करावे हे गीतेत सांगितले आहे. सर्व ग्रंथाचे सार गीतेत आहे. रोज गीता म्हणावी. ती म्हणतांना उच्चार स्पष्ट हवेत. प्रत्येक शब्द समजून घेऊन तो संधीसहीत उच्चारावा. गीतेतील संस्कृत शब्दांचा अर्थ कळला नाही तरी त्याच्या उच्चारातून होणारी स्पंदने-संवेदना जाणवतात व आनंद मिळतो. गीतेमुळे आचरा-विचार-उच्चार शुध्द-पवित्र होतात. लक्ष्मी चंचल आहे असे म्हटले जाते, पण लक्ष्मी चंचल नसून मनुष्य चंचल आहे. त्याची ती चंचलता जाण्यासाठी गीतेचा ६ वा अध्याय वाचावा. पालकांनी मुलांना अर्थासहित गीता शिकवावी. कृष्ण गाईचे दूध काढतो व ते अर्जुनाला देतो. अर्जुन ते दूध पिऊन तृप्त होतो. येथे गाय

म्हणजे गीता व गाईचे दूध म्हणजे वात्सल्य. कृष्णाने अर्जुनाला पाजलेल्या ज्ञानरुपी दुधात वात्सल्य आहे. गीता हा हिंदूचा पवित्र ग्रंथ. विवेकानंदांनी हिंदू धर्म सर्वधर्मात श्रेष्ठ आहे हे जगाला पटवून दिले. सावरकरांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी आपले सारे आयुष्य वेचले. समाजात सद्‌भावनेचा प्रसार व्हावा म्हणून गोखले कुटुंबियांनी जो उपक्रम हाती घेतला आहे ते एक पुण्यकर्म आहे'' असे डॉ. आपटे म्हणाले. आपल्या ओघवत्या वाणीत त्यांनी तत्त्वज्ञान विषयक अनेक गोष्टी सांगितल्या त्या सर्वांचा परामर्श येथे घेणे शक्य होणार नाही.

त्यानंतर श्री. शं. बा. मठ यांनीही मोजक्या शब्दात पण अत्यंत मौलिक अशी माहिती आपल्या मनोगतातून दिली. ब्राह्म तेज व क्षात्र तेज एकत्र आले तर कशी क्रांती होते त्याचे उदाहरण म्हणजे गीता. कृष्ण-ब्राह्मण म्हणजे बुद्धी (स्थिरबुद्धी), अर्जुन-क्षत्रिय म्हणजे अथक परिश्रम'' हे दोन एकत्र आले तर तर कशी क्रांती होऊ शकते हे गीतेने दाखवून दिले आहे. गोखले कुटुंबियांचा हा गीतापठण स्पर्धा कार्यक्रम स्तुत्य आहे. अभ्यासा व्यतिरिक्त ज्ञानासाठी स्पर्धा हव्यातच असे ते म्हणाले.

नंतर श्री. श्री. वि. करंदीकर मनोगतात म्हणाले, ''सर्वांगिण विकासासाठी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांतून भाग घ्यावा. रोज गीतेचा एक तरी अध्याय घ्यावा. रोज गीतेचा एक तरी अध्याय वाचावा'' नंतर स्पर्धेच्या सर्व परिक्षकांना पाहुण्यांचे हस्ते गुलाब पुष्प देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्यानंतर पाहुण्यांचे हस्ते स्पर्धेतील यशस्वीतांना टाळ्यांचे कडकडाटात पारितोषिक प्रदान करण्यात आली. पारितोषिक प्राप्त करणारे विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

**पहिला गट - प्रथम क्रमांक** कु नम्रता नांबियार- सिंघानिया विद्यालय **द्वितीय क्रमांक** - तुषार जोशी - सिंघानिया विद्यालय **तृतीय क्रमांक** - नेहा पुसाळकर - ए. के. जोशी विद्यालय **उत्तेजनार्थ** - आदिती गोखले - ए. के. जोशी विद्यालय व दिशा आचार्य - सिंघानिया विद्यालय

**दुसरा गट - प्रथम क्रमांक** - मनिष काळे -ए. के. जोशी विद्यालय **द्वितीय क्रमांक** - कल्पेश कळके - डॉ. बेडेकर विद्या मंदिर **तृतीय क्रमांक** - मोनिका इनामदार -डॉ. बेडेकर विद्या मंदिर **उत्तेजनार्थ** - अभिजीत पाटील व तन्मय पाटील - डॉ. बेडेकर विद्या मंदिर

पारितोषिक वितरण झाल्यावर प्रत्येक गटातील यशस्वी विद्यार्थ्यांनी खणखणीत व स्पष्ट आवाजात १६ व १७ वा अध्यायातील ५/५ श्लोक म्हणून दाखविले. प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून त्याला चांगली दाद दिली. त्यानंतर सौ. अल्पना बापट यांनी सर्वांचे आभार मानले. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांस प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. ह्या समारंभास विद्यार्थी, पालक, मंडळाचे सदस्य, शिक्षक वर्ग, अन्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह्या समारंभाचे सूत्र संचलन सौ. शेवडे यांनी खणखणीत आवाजाच्या निवेदनासह अत्यंत उत्तमप्रकारे केले होते. सकाळी ११.३० ला सुरू झालेला हा पारितोषिक वितरण समारंभ दुपारी १ वाजता संपला !

साप्ताहिक ठाणे परिसरच्या सौजन्याने

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाची**

आगामी परिषद

नोव्हेंबर २००६

माहिती तंत्रज्ञान विभाग संयोजित

**'लिनक्स, ठाणे २००६'**

## ए. के. जोशी हायस्कूलने आयोजित केला आजी -आजोबा स्नेहसोहळा

आजकाल सर्वच शाळा 'पेरेंट डे' साजरा करतात. पण ए. के. जोशी हायस्कूलने नुकताच आजी-आजोबा स्नेहसोहळा (ग्रँड पेरेंटस् डे) साजरा करुन आगळ्या-वेगळ्या प्रयोगशील उपक्रमाचा मानाचा तुरा आपल्या शिरपेचात खोवला. सुमारे ५०० आजी-आजोबांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला. शाळेने अत्तर, गुलाबपाणी, भेटकार्ड आणि अल्पोपहार देऊन या 'ज्येष्ठपर्वा'चे आपुलकीने स्वागत केले.

शाळेने आपल्या वार्षिक स्नेहसोहळ्याच्या कार्यक्रमात पूर्व प्राथमिक विभागाने हा आगळा वेगळा उपक्रम राबविला.

मुलांच्या जडणघडणीत आजी-आजोबांचे स्थान मोठे आहे. पण सध्याच्या 'हम और हमारे दो' च्या जमान्यात काही घरातील हे स्थान हरवले आहे तर नातवंडांच्या शालेय जीवनाशीही अनेकांचा संबंध केवळ रिक्षावाल्या काकांपर्यंत सोडण्यापुरताच उरला आहे. शालेय जीवनाशी प्रत्यक्षपणे जोडण मात्र दूरच राहिली आहे. काळाच्या ओघात कुठेतरी धुसर होऊ घातलेल्या या नात्याला पुन्हा फुलविण्याचे आणि उजळविण्याचे काम या 'ग्रँड पेरेंट डे' उपक्रमाने केले.

राजेंद्र पाटणकर, सतीश आगाशे, अंजली आमडेकर आणि अनुया मुर्डेश्वर यांनी या निमित्ताने मंगला गोडबोले यांच्या झुळूक, नवी झुळूक आणि झुळूक आणि पुन्हा झुळूक या लेखमालेतील समान सुत्रे एकत्रित करुन तयार केलेल्या अभिवाचनाचा आनंद सर्व आजी-आजोबांनी मनसोक्त लुटला. या झुळकेची सुखद स्मृती जागवित आजी-आजोबा घरोघरी परतले.

माध्यमिक विभागाने वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम उपस्थितांची दाद घेऊन गेला. जास्तीत जास्त मुलांचा सहभाग, शिक्षक व मुलांची कल्पकता, फिल्मी गाण्यांना पूर्णपणे फाटा, गायक आणि वादक म्हणून शिक्षक-विद्यार्थ्यांनीच पार पाडलेली भूमिका हे या कार्यक्रमाचे अनोखे वैशिष्ट्ये ठरले. जॉन्सन आणि जॉन्सनचे व्यवस्थापक श्री. प्रभाकर केळकर यांचे मौलिक मार्गदर्शन या कार्यक्रमाला लाभले.

या वार्षिक स्नेहसंमेलनात प्राथमिक विभागाने सादर केलेले कार्यक्रम तर त्यांच्या अंगी असलेल्या प्रचंड उर्जेचा प्रत्यय देणारेच होते. एकेका कार्यक्रमात जवळ जवळ १०० मुले, हाताळले गेलेले वेगवेगळे विषय आणि ते सादर करताना शिक्षक व मुलांच्या एकत्रित प्रयत्नांचा दिसलेला आविष्कार पाहून उपस्थित खुश झाले. होमी भाभा विज्ञान केंद्राच्या जयश्री रामदास यांच्या मार्गदर्शनाने या कार्यक्रमाची उंची आणखीनच वाढली.

व्यासपीठाची कलात्मक मांडणी, सजावट केलेला आकर्षक पडदा, त्यातून मिळणारा सामाजिक संदेश, शेवटच्या प्रेक्षकालाही कार्यक्रम व्यवस्थित दिसावा म्हणून प्रक्षेपणाची केलेली सोय, दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन प्रसारमाध्यमांद्वारे मुलांवर होत असलेल्या अनेक विकृत कार्यक्रमांच्या माऱ्याला दिलेले चोख उत्तर आदि अनेक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींमुळे या शाळेचा वार्षिक स्नेहसोहळा दीर्घकाळ स्मरणात राहील असा ठरला. मुख्याध्यापिका कालिंदी कोल्हटकर, सहयोगी शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी-विद्यार्थीनी यांच्या समूहिक प्रयत्नांची आणि कल्पकतेची मुद्रा उमटल्याचा प्रत्यय या स्नेहसोहळ्याने आणून दिला.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे केंद्रात शोधनिबंध सादरीकरण शिबिर संपन्न**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे केंद्रात शनिवार दि. २४ डिसेंबर २००५ रोजी शोधनिबंध सादरीकरण शिबिराचा समारोप समारंभ पार पडला. हे शिबीर सलग तीन दिवस म्हणजे दि. २२,२३,२४ डिसेंबर असे पूर्णवेळ होते. सदर शिबीर ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे होते.

या तीन दिवसात विद्यार्थ्यांनी ग्रंथालय संगणकीकरण, अमुद्रित ग्रंथेतर साहित्याचे व्यवस्थापन, सोल प्रणाली, इन्फ्लिबनेट, संशोधन ग्रंथालये, युजीसी, नॅक समिती इत्यादी महत्त्वपूर्ण विषयावर आपले शोध निबंध सादर केले. शिबिराचे निरीक्षक आणि मार्गदर्शक म्हणून प्रा. सौ. सुषमा पौडवाल, ग्रंथपाल एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ व डॉ. दत्तात्रय फडके, सहाय्यक ग्रंथपाल आय.आय.टी.ग्रंथालय, पवई सहभागी होते तर शिबिराचे संयोजन केंद्रप्रमुख प्रा. मोहन पाठक यांनी केले होते.

समारोपप्रसंगी श्री. जाधव (विभागीय केंद्र य.च.म.मुक्त विद्यापीठ, मुंबई) आणि प्रा.सौ. अकोलकर (उपप्राचार्या, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय) तसेच सौ. पौडवाल व श्री. फडके इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी झालेल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये सौ. पौडवाल व डॉ. फडके यांनी आपल्या भाषणामध्ये विद्यार्थ्यांना शोधनिबंध सादरीकरणाची तंत्रे व अभ्यास विषयासंबंधी मार्गदर्शन केले तर उपप्राचार्य सौ. अकोलकर यांनी महाविद्यालयाच्या बदलत्या स्वरुपाचा धावता आढावा घेऊन उपलब्ध सुविधांविषयीची माहिती उपस्थितांना करुन दिली. श्री. जाधव यांनीही आपल्या भाषणामध्ये विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व संपूर्ण मुक्त विद्यापीठाच्या सदर अभ्यासक्रम राबविण्यामागची भूमिका विशद करुन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीकरींता शुभेच्छा दिल्या.

शिबिरा दरम्यान विशेष उपस्थिती होती ती डॉ. प्रदीप कर्णिक, प्रा. नारायण बारसे, प्रा. काळे, डॉ. करमरकर आणि (कार्यालय अधिक्षक) यांची या प्रत्येकानेच विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन शिबिरामध्ये केले. समारोपप्रसंगी एम.लिब व बी.लिबचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान शिबिरार्थींना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्रे बहाल करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिबिराचे विद्यार्थी श्रीनिवास आठल्ये यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय कमलेश निकम व स्वागत सौ. अनिता माधवी, कु. रुचिता ठाकूर यांनी केले. समारोप प्रसंगी राजेश धुळे, अरुण धायबार, भाईदास जाधव यांनी शिबिराबाबत आपले मनोगत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रसाद रणदिवे यांनी केले व कार्यक्रमाचा शेवट सौ. विनया यांच्या सुमधूर पसायदानाने झाला. शिबिराचे तीन दिवस चर्चात्मक मार्गदर्शन आणि खेळीमेळीच्या उत्साही वातावरणात पार पडले.

सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत शिंगाडे, सुनील पवार, योगानंद अहिराव, सौ. सुलभा कुलकर्णी, सौ. प्रज्ञा दांडेकर, कु. सिद्धी मांद्रेकर, श्री. बाबर, सुनील केदारे या विद्यार्थ्यांनी तसेच बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालय सेवकांनी बरीच मेहनत घेतली.

**संकलित**

# श्रद्धांजली



श्री. लक्ष्मण गजानन देव. जन्म १४-११-१९१३ कोकणात राजपूर तालुका, कोंडिवळे येथे. प्रथम वर्गात मॅट्रिक मुंबई विद्यापीठ, राजापूर स्कूल मधून. Central Excise Dept. मधे नोकरी. तेथेच Dy. Astt. Collector म्हणून निवृत्त.

वि. प्र. मंडळामधे १९६० मधे प्रवेश. मंडळाच्या कार्यकारिचे सदस्य. यात कार्यवाह, कोषाध्यक्ष व कार्याध्यक्ष म्हणून १९६० ते २००४ मध्ये निवृत्त होईपर्यंत कार्यरत होते. शाळा व महाविद्यालयांच्या सर्व सभांना हजर रहात व सर्व विषयात मनापासून रस घेऊन चर्चेत भाग घेत असत. ते मितभाषी तसेच वादापासून दूर असणारे सात्विक व्यक्तिमत्त्व होते.

श्री. देव यांचे २९-१-२००६ रोजी रात्री १०वाजता वार्धक्यामुळे निधन झाले. वि. प्र. मंडळाची ४-२-२००६ रोजी शोकसभा झाली. सभेस मंडळाचे अध्यक्ष, कार्यवाह व इतर सभासद, शाळा व महाविद्यालय प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या दोन कन्या, जावई व इतर बरेच नातेवाईक हजर होते. अध्यक्ष व नातेवाइकांपैकी बऱ्याच मंडळींनी यथायोग्य माहिती देऊन श्रद्धांजली वाहिली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच प्रार्थना.

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे